आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

# शेतकरी संघटक

६ मे २०१२ । वर्ष २१ । अंक ३

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियंत्रणातून भाजीपाला, फळे नियंत्रणमुक्त होतील काय ?



# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक ३ । ६ मे २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी
**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**


**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com


● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




## अंतरंग


मुद्दा
**बाजार समितीची काठी, शेतकऱ्याच्या पाठी**
गिरधर पाटील ........ ३

मुलाखत
**शेतकऱ्याला हवे बाजार, तंत्रज्ञान स्वातंत्र्य**
ज्ञानेश उगले ........ ४

विचार
**मदत नव्हे संकट!**
चेतन भगत ........ ६
**राखीव जागांचा पाऊस अन् पटपडताळणीची पडझड**
एका शिक्षकाचे मनोगत ........ ८

मिरचीचं खळं
**अशी ही बनवा बनवी**
बाबू सोंगाड्या........ ९

कॉमन नॉन सेन्स
**महाराष्ट्राची महाघसरण**
सुधाकर जाधव ........ १०

वाङ्मय शेती
**असा आहे आमचा शेतकरी**
गंगाधर मुटे ........ १२

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १४

**संपादकीय * श्रीकांत उमरीकर**

# अबब! पवार साहेब काय बोललात हे...

महाराष्ट्राच्या राजकारणाची ज्यांना नसनूनस माहीत आहे, थोरल्या साहेबांनंतरचे (यशवंतराव चव्हाण) जे थोरले साहेब आहेत (त्यांच्या नंतरचे धाकटे साहेब आपल्या टगेगिरीच्या कर्तृत्वानं दादा म्हणून घेतात.) जाणते राजे, प्रतिभापती (महाराष्ट्रातल्या भल्या भल्या प्रतिभावंतांचं पानही (पत्ता) ज्यांच्याशिवाय हलत नाही किंवा ज्यांच्याशिवाय या प्रतिभावंतांना कोणी 'पत'ही देत नाहीत), जगाला वेड लावणाऱ्या क्रिकेटला ज्यांनी वेडं केलं असे कायमस्वरूपी पंतप्रधान पदाच्या प्रतिक्षेतील शूरवीर माननीय शरदचंद्रजी पवार साहेब पुण्यात एका कार्यक्रमात बोलले. हे जाणते राजे असं म्हणाले की, गेली ४५ वर्षे ऊस आणि साखरेसाठी मी काम केलं; पण ऊस आणि साखरवाले परवा माझ्या दारात येऊन बसले आणि तेव्हापासून मी असं ठरवलं की, यापुढे ऊस आणि साखरेसाठी शब्द खर्च करणार नाही. अरे बाप रे, काय घडले हे? जुन्या नाटकांच्या भाषेत बोलायचे तर मुंग्यांनी मेरू पर्वत तर गिळला नाही ना? सूर्य पश्चिमेला तर उगवला नाही ना?' पवार साहेब आणि साखर यांचा संबंध नाही म्हणजे काय? सहकाराचं एवढं मोठं साम्राज्य म्हणजे कारखाने नाही म्हणत आम्ही; या कारखान्यांचे जे मालक आहेत त्यांच्या जीवावर उभारलेलं साम्राज्य म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि त्या पक्षाचे मालक म्हणजे पवार साहेब आणि तेच असं म्हणतात की, मी आता साखरेसाठी शब्द टाकणार नाही. काय हे?

बरं कार्यक्रम कुठला तर ब्राझील आणि भारताच्या साखर उद्योगाची तुलना करणाऱ्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ. पवार साहेबांच्या मांडीला मांडी लावून सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, जे की सध्या काँग्रेसमध्ये आहेत. हे यासाठी सांगायचं की युतीच्या काळात ते अपक्ष होते आणि मंत्रीही होते. तर ते असो. याच कार्यक्रमात हर्षवर्धन पाटील यांनी सहकार मजबूत करण्याची गरज व्यक्त केली म्हणजेच सहकारी कारखान्यांचे मालक मजबूत करा, म्हणजेच पर्यायाने पक्ष मजबूत करा आणि पवार साहेब तर म्हणतायत, मी साखरेसाठी शब्द टाकणार नाही. आता काय करा?



शेतकऱ्यांसाठी चळवळ करणारे सगळेच असं म्हणतात. पवार साहेबांच्या शब्दांमुळे साखर उद्योगाचे हे हाल झाले म्हणजे आता पवार साहेब जर साखरेत लक्ष घालणार नसतील (त्यांच्या बोलण्याचा सरळ अर्थ काढण्याचा वेडेपणा केला तर...) तर साखर उद्योगाचं आता होणार काय? पुढे बोलताना पवार साहेब असं म्हणाले, 'बाजरी आणि ज्वारी पिकवणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांसाठी आंदोलन का करत नाही?' त्यांचा रोख कुणाकडे होता हे महाराष्ट्रातल्या शेंबड्या पोरालासुद्धा कळतं. काँग्रेसी नेत्यांच्या चिथावणीवरून माननीय खासदार राजू शेट्टी उठले आणि पदयात्रा घेऊन बारामतीत धडकले. ही ठसठस आजही पवार साहेब विसरायला तयार नाहीत. या पदयात्रेच्या रस्त्यामध्ये हर्षवर्धन पाटलांचंही गाव होतं; पण मात्र कुठलेही आंदोलन राजू शेट्टींनी केले नाही. हेही साहेबांच्या ठसठशीचं कारण. त्याही आधीचं कारण जरा वेगळंच आहे. २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीत दक्षिण महाराष्ट्रातल्या पवार साहेबांच्या गडामध्ये प्रचंड पडझड झाली. कोल्हापूरला सदाशिवराव मंडलिक, इचलकरंजीला राजू शेट्टी, सांगलीला प्रतीक पाटील असे खासदार निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचा नामोनिशाण राहिले नाही. या भागांमध्ये काँग्रेसवाल्यांनी जे पोस्टर्स लावले होते त्यावर प्रतीक पाटलांचा फोटो आणि खाली राजू शेट्टी आणि सदाशिवराव मंडलिकांचे फोटो आणि वाक्य होतं, एकावर दोन फ्री. ही जी एकावर दोन फ्रीची स्कीम होती त्यामध्ये राष्ट्रवादीचा कचरा झाला. ती ठसठस अजूनही साहेबांच्या मनात असावी. या सगळ्या पार्श्वभूमीवर साहेब परवा बोलले. बरं दुसरी एक भानगड लगेचच उत्पन्न झाली- या मागे ज्यांचा हात होता ते पतंगराव कदम त्यांची काँग्रेस पक्षात घुसमट होते आहे, त्यांनी योग्य ती दिशा धरून कृती करावी, असं एक विधान साहेबांनी केलं आणि अपेक्षेप्रमाणे पूर्ण गोंधळ उडवून दिला. आता उद्या पतंगराव राष्ट्रवादीमध्ये आले तर मग आर. आर. पाटील, जयंत पाटील कंपनीचं कसं? यात पुन्हा एक भानगड म्हणजे पतंगराव कदमांच्या दिवट्या चिरंजीवांनी युवक काँग्रेसची निवडणूक जिंकल्यावर आपल्या पंखांत प्रचंड शक्ती आल्याचा आव आणत एक विधान राष्ट्रवादीबद्दल ठोकून दिलं. राष्ट्रवादी काँग्रेसने घड्याळ हे चिन्ह बदलून खंजीर हे चिन्ह घ्यावं, कारण धोका देणे ही राष्ट्रवादीची वृत्ती आहे. आणि त्याच दिवट्या चिरंजीवांच्या वडलांना पवार साहेब खुणा करून आपल्याकडे बोलवत आहेत. सांगा पवार साहेब, तुमच्या बोलण्याचे काय अर्थ काढायचे. गेली ४५ वर्षे तुम्ही साखरेसाठी शब्द टाकलात. साखरेचं काय झालं सांगायची गरज नाही. तुमचेच अनुयायी असलेले धाकल्या साहेबांचे जवळचे नातेवाईक असलेले उस्मानाबाद नरेश, उस्मानाबादचे सम्राट, उस्मानाबादचे भाग्यविधाते माननीय खासदार पद्मसिंह पाटील यांच्याच गावात शेतकऱ्यांनी उभा ऊस पेटवून दिला ही आताची घटना आहे. पवार साहेब तुमच्याच वृत्तपत्रात या बातम्या सक्काळी सक्काळी उभ्या महाराष्ट्राने वाचल्या आणि महाराष्ट्र आडवा झाला. हे सगळं नुकतंच घडलंय आणि तुम्ही सांगताहात साखरेबद्दल मी आता शब्दही टाकणार नाही.

ज्वारी आणि बाजरीच्या शेतकऱ्यांबद्दलची भाषा तुमच्या तोंडून बाहेर पडली आणि सगळेच अवाक् झाले. एरवी ज्वारी, बाजरी, मक्यापासून मद्यनिर्मिती करण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी मागणी होत होती, त्याला खोडते घालण्याचं काम तुम्हीच केलंत आणि जे परवाने दिले तेही राजकीय पार्श्वभूमीच्या लोकांनाच. मग सांगा ना पवार साहेब, ज्वारी, बाजरीसाठी कोण आणि काय आंदोलन करणार? साहेब तुमचं आता वय झालं, असं तुम्हीच सांगत फिरता. लोकसभेची निवडणूक लढवायची नाही, असंही तुम्हीच म्हणत फिरता मग तुम्हीच करा ना आंदोलन. असंही तुम्ही शेतकऱ्यांसाठी मे महिन्यात आंदोलन करण्याचं घोषीत केलंच आहे. फार चांगली गोष्ट आहे. जो मंत्री शेतीविषयक धोरणं ठरवतो, ज्याच्या धोरणांनी लाखो शेतकरी आत्महत्या करतात, करोडो शेतकरी आत्महत्येच्या कड्यावर उभे राहतात, करोडो शेतकरी हलाखीचे जीवन जगतात आणि तोच आता म्हणतो आहे- शेतकऱ्यांसाठी आंदोलन करायचं. क्या बात है! एक उर्दु शेर आहे :

*क्या खूब रंग बदल दिया है इन्किलाब ने गुलिस्ताँ का*
*फूल मुरझा गए और काँटो में बहार आ गयी*

असंच काहीतरी घडताना दिसत आहे. आता राज्यकर्तेच आंदोलन करणार म्हणे! करो बापडे! आमच्या त्यांना शुभेच्छा. पण पवार साहेब हे तुम्ही खरंच बोललात ना? नाहीतर उद्या परत तुम्हीच सांगायचे, मी असं बोललोच नाही!

# बाजार समितीची काठी, शेतकऱ्याच्या पाठी



गिरधर पाटील

सद्य महागाईग्रस्त सामान्यजन व उत्पादक शेतकरी या दोघांची कोंडी करणाऱ्या बंदिस्त शेतमाल बाजारात काहीशी मुक्तता आणण्याचा निर्णय नुकताच शासनाने जाहिर केला. काही भाज्या व फळे ही बाजार समिती कायद्यातून वगळावीत, शेतकऱ्यांना ती कुठेही-कोणालाही विकता यावीत व शेतमालाच्या बाजार भावातील नफ्याचा भाग म्हणून त्याच्या पदरात अधिकचे दोन पैसे पडावे अशी भावना या निर्णयामागे आहे. शेतमाल तयार झाला की सध्या पर्याय नसल्याने खरेदीचा एकाधिकार असलेले व्यापारी, दलाल व आडते या मालाचे भाव पाडतात व शेतमालाला रास्त भाव मिळू देत नाहीत ही शेतकऱ्यांची शतकांपासूनची तक्रार खरी असली तरी या लॉबीच्या प्रचंड ताकदीपुढे व त्याला मिळणाऱ्या शासनाच्या छुप्या पाठींब्यामुळे हे शक्य होत नव्हते. आता मात्र शेतकऱ्यांमधील जागरूकता, चळवळींचा दबाव व जागतिक व्यापार करारातील तरतुदीचा एक भाग म्हणून हा निर्णय शासनाला घ्यावा लागलेला दिसला तरी शासनाने हरकती मागवून या निर्णयाच्या अंमलबजावीत स्वतःच अडथळे उभारण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते आहे. शेतकऱ्यांबाबत निर्यातबंदी सारखे अनेक निर्णय घेतांना शासन शेतकऱ्यांकडून अशा हरकती मागवत नसतांना केवळ हे घटक न्यायालयात जातील या भितीने हरकती मागवून काही हजारात असलेल्या या घटकांसाठी साडेसहा कोटी शेतकऱ्यांचा निर्णय टांगणीला लावला गेला आहे. एवढे करूनही हे घटक न्यायालयात जाणारच नाही याची कुठलीही हमी शासनाकडे नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

पणन खात्याचा शेतकऱ्यांच्या हिताच्या निर्णयाबाबतचा आजवरचा अनुभव फारसा समाधानकारक नाही. असे निर्णय राबवण्यात न्यायालयीन प्रक्रियांचा आधार घेत शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय हाणून पाडण्याचे सत्कर्म या प्रभावी लॉबीने पार पाडले असून दर वेळेला शासनाची भूमिका बोटचेपेपणाची रहात आली आहे. कायद्यात विषद केलेले पण प्रत्यक्षात वापरात नसलेले अनेक शेतकरी हिताचे निर्णय न्यायालयात खितपत पडले आहेत. वास्तवात मुळात शेतकऱ्यांसाठी व त्यांच्या शेतमाल विक्रीसाठी कायद्याने स्थापन झालेल्या या व्यवस्थेत शेतकरीहित बाजूला सारून यावर पोट भरणाऱ्या बांडगुळांची दडपशाही व अरेरावी सहन करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. पाळलेल्या कुत्र्याने थेट मालकाच्याच थाळीवर हल्ला चढवावा असाच हा प्रकार आहे.

व्यापारी-हमाल-मापारी-माथाडी या साऱ्या शेतमाल विक्रीत सेवा बजावणाऱ्या अनुषांगिक उपसंस्था आहेत. त्यांच्यासाठी ही व्यवस्था नाही तर ते या व्यवस्थेसाठी आहेत. या व्यवस्थेत परवाने देऊन सेवा देण्याची परवानगी त्यांना दिली जाते. त्यांनी या व्यवस्थेत काम करावेच अशी कुठलीही सक्ती त्यांच्यावर नाही. एकाद्या नोकराने मालकाने आपल्या सर्व सेवा स्वीकारल्याच पाहिजेत असे बंधन मालकावर कसे घालता येईल? परंतु सध्यातरी या बाजार समित्यांमध्ये मालक कोण व नोकर कोण याचाच पत्ता लागत नाही. या साऱ्या अनुषांगिक घटकांना उपलब्ध झालेल्या एकाधिकारामुळे व शेतकऱ्यांच्याच एकंतरीत अज्ञान व असंघटितपणामुळे दाराशी चालून आलेला शेतमाल कवडीमोल भावात हडप करण्याची संधी व चटक  लागल्याने शेतकऱ्यांना काही फायदा न होता या एकाधिकारावर ही सारी मंडळी गडगंज व मस्तवाल झाली आहे. त्यातून निर्माण झालेल्या ताकदीवर शासनव्यवस्था नियंत्रित करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. या दडपशाहीतून अनेक अनुचित व्यापारी प्रथा जसे ढिगाने लिलाव, रूमालाआड सौदे, शंभरावर सात ते दहा जुड्या फुकट, विकलेल्या मालाचा गैरहिशेब व पैसे वेळेवर न देणे, प्रसंगी बुडवणे असे लूटमार सदृश्य वातावरण साऱ्या शेतमाल बाजारात स्थिरावले आहे. याला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर जीवघेणे हल्ले झाल्याची अनेक उदाहरणे असून मानवाधिकार आयोगाने ताशेरे ओढूनही संबंधितांवर काही कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही. बाजार समित्यांच्या व्यवस्थापनावर कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असूनही असूनी मालक घरचा हा शेतकरी मुठीत जीव घेऊन या बाजार समित्यांमध्ये वावरत असतो.

भारतीय शेतमाल बाजारातील एकाधिकार संपवणे व या क्षेत्रात पर्यायी व्यवस्था आणण्याच्या दृष्टीने संमत केलेल्या मॉडेल ॲक्टचा अर्थच पणन खात्याला समजला आहे की नाही याचीच शंका येते. अन्यथा त्यांनी कायदेशीर वा नैतिक कुठलाही अधिकार नसलेल्या घटकांकडून अशा हरकती मागवल्याच नसत्या. एकवेळ ठिकठिकाणच्या बाजार समित्यांनी आपण परवाने दिलेल्या घटकांकडून अशा हरकती मागवल्या असत्या तर समजले असते. मात्र पणन खात्याचा सरळ या घटकांशी तसा काहीएक संबंध नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

वास्तवात २००१ साली केंद्राने पारित केलेला मॉडेल ॲक्ट शासनाने सातआठ वर्षे चालढकल न करता वेळेत स्वीकारून त्यावर पर्यायी व्यवस्था उभारण्याची काळजी घेतली असती तर शासनासमोर आता निर्णयक्षमतेच्या अभावाचा काट्याचा नायटा जो उभा ठाकला आहे तो झाला नसता. आज या विषयाची ऐवढी गुंतागुंत झाली आहे की सर्व विहीत मार्गांत असंख्य अडचणींचे डोंगर उभे राहिल्याचे दिसते आहे. शासन स्वतः काही निर्णय घेत नाही व प्रत्येक व किरकोळ निर्णयासाठी न्यायालयात जाणे शेतकऱ्यांना शक्यही नाही व परवडणारेही नाही. सत्ताधाऱ्यांना रोज रोखीत पैसे गोळा करणाऱ्या बाजार समित्या व वाशीच्या मधाच्या बोटाचा मोह सुटत नाही व त्यामुळे शेतकऱ्यांच्या पाठी लागलेला शोषणाचा ससेमिरा सुटत नाही असे हे दुष्टचक्र आहे.

आजही पर्यायी व्यवस्था कार्यान्वित न झाल्याने अशा परिवर्तनाच्या काळात हे सारे घटक अडचणी निर्माण करू शकतात. प्रचलित व्यवस्थेला पर्याय उभा करण्याची जबाबदारी या कायद्यानुसार शासनावरच टाकलेली असल्याने शासनाला यातून अंग झटकता येणार नाही. शेतकरी हिताच्या सबबीआड लपत शासन परत जर आहे त्या मार्गानेच जाणार असेल तर या क्षेत्रातील परिवर्तनाच्या साऱ्या शक्यताच संपुष्टात येतात. याही वेळेला शेतकरी हिताची ढाल पुढे करत शेतकरी व ग्राहकांच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी आपण गमावतो की काय अशी परिस्थिती आहे.

महाराष्ट्रातील साऱ्या शेतकऱ्यांची शासनाला विनंती आहे की या घटकांच्या कुठल्याही खेळीला, धमकीला वा संपाला मुळीच भिक घालू नये. हा संप एक इष्टापत्ती मानून पर्यायी व्यवस्थेला अवकाश मिळू द्यावा. नवीन व्यवस्थाच नव्हे तर नवीन गुंतवणूकही या क्षेत्रात अपेक्षित आहे व येते आहे. या नवगतांना चूकीचे संदेश गेल्यास परत याच नरकात खितपत पडावे लागण्याची शक्यता आहे. नवीन पुरवठा साखळ्या तयार होईपर्यंत शेतकऱ्यांनीही थोडी कळ काढावी. मात्र एक खबरदारी शासनाने जरूर घ्यावी की जे व्यापारी वा माथाडी संपावर जातील त्यांचे परवाने रद्द करण्यात येतील असे नुसते जाहिरच नव्हे तर तशी कारवाईही प्रत्यक्षात करावी. मागच्या अनेक आंदोलनात शेतकरी संघटनेने यांचे नुसते परवाने रद्द करण्याची मागणी केली होती, हे सारे घटक निमूटपणे दुसऱ्याच दिवशी कामावर हजर झाले होते.

शेतकऱ्याच्या वैध व न्याय्य मागण्यांच्या आंदोलनावर लाठीमारच नव्हे तर गोळीबारही करणारे सरकार या बेकायदेशीर संपाबाबत काय भूमिका घेते हेच या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकेल.

**डॉ. गिरधर पाटील** girdhar.patilgmail.com ■■

# शेतकऱ्याला हवे बाजार, तंत्रज्ञान स्वातंत्र्य!

**मुलाखत** - गिरधर पाटील **मुलाखतकार** - ज्ञानेश उगले

हिशेबीपणा अंगी बाणावा -
शेतीतील लोकांनी पारंपरिक पद्धतीने विचार करण्याचे सोडून वस्तुनिष्ठ, अर्थवादी, व्यावहारिक भूमिका घ्यायला शिकावे. आजच्या आधुनिक जीवनात टिकून राहायचे, तर जातीयवाद, राजकारण, अनिष्ट स्पर्धा यांपासून लांब राहत 'माझी शेती, माझा उद्योग' हेच सूत्र समोर ठेवून काम केले पाहिजे. नेमके काय केल्याने काय फायदा होईल, असा हिशेबीपणा अंगी बाणवला तरच टिकाव लागेल.



**प्रश्न : शेतीसमोर आज कोणकोणत्या समस्या आहेत असे वाटते?**

**उत्तर :** शेतीसमोरील मुख्य समस्या बाजार आणि तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य यांच्याशीच निगडीत आहेत. आजवरच्या शेतीची वाटचाल पाहिली तर, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांची उत्पादनाचे उच्चांक गाठले आहे; पण बाजारात त्याच्या पदरात योग्य मोल पडलेच याची खात्री नसते. परिणामी शेतीचे भांडवल हळूहळू कमीच होत राहिले. शेतकऱ्याची आर्थिक क्षमताच लयाला गेली. त्याचे दुष्परिणाम उत्पादनावर झालेले दिसतात. शेतीमालाला योग्य मोबदला मिळणे हे केवळ शेतकऱ्याच्याच नाही, तर आगामी काळात शेती जिवंत राहण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरणार आहे. यावर शेती करू नये, हा काही पर्याय नाही. शेतीत राहूनच शेती फायद्याची होणे गरजेचे आहे. ६५ टक्के भारतीय शेतीवरच अवलंबून आहेत. शेती फायद्याची झाली तर रोजगाराच्या असंख्य संधी यातून उपलब्ध होतील. दुसरीकडे सरकारने शेतीसाठी मूलभूत सुविधा, साधनसामग्रीत अपेक्षित गुंतवणूक केली नाही. आजवरचा अनुभव सांगतो की, सवलती जाहीर होतात, त्याचा सरळ फायदा खत कंपन्या, सहकारी बँका, साखर कारखान्यांसारख्या उद्योगांना होतो. त्यामुळे आता सारे प्रयत्न शेतीतील लुप्त झालेल्या शेतकऱ्याच्या भांडवलाची पुनर्उभारणी करणे, हाच असायला हवा.

**प्रश्न : बाजार व्यवस्था आणि तंत्रज्ञान शेतकऱ्याच्या आवाक्यात कसे येईल?**

**उत्तर :** अन्न ही माणसाची मूलभूत गरज. त्यामुळे अन्नाचा बाजार कधीही अयशस्वी ठरत नाही. मात्र या बाजारात उत्पादक शेतकऱ्याच्या पदरात योग्य मोल पडणार नसल्याने त्याचे बाजारस्वातंत्र्य हिरावून घेण्याचाच तो एक भाग ठरतो. बाजारात मागणी असेल, पुरवठाही शक्य असेल, तर या उत्पादकाला त्याच्या उत्पादन खर्चाइतका भाव मिळण्यात काहीच हरकत नसावी; परंतु भारतीय शेतीमाल बाजारात अशी विचित्र परिस्थिती झालीय की, हे बाजारस्वातंत्र्य शेतकरी व ग्राहक या दोघांच्याही हिताचे रक्षण न करता काही विशिष्ट एकाधिकार निर्माण करणाऱ्या घटकांच्या हाती गेले आहे. या साऱ्या घटकांना दुर्दैवाने कायद्याचे संरक्षण प्राप्त झाल्याने शेतकऱ्यांना एक मोठा लढा द्यावा लागणार आहे. हीच स्थिती तंत्रज्ञान स्वातंत्र्याबद्दल आहे. जागतिक स्तरावर शेतीक्षेत्राच्या वाटचालीचा जर अभ्यास केला तर तंत्रज्ञानाचा फार मोलाचा वाटा असल्याचे दिसून येते. तंत्रज्ञान वापरून इतर अनेक देश पुढे गेलेत. अमेरिकेसारखा मोठा किंवा न्युझीलंडसारखा लहान देशाने शेतीक्षेत्रात गाठलेली मजल आश्चर्यकारक आहे. भारतात स्वातंत्र्यानंतर भेडसावणाऱ्या अन्नाच्या दुर्भिक्षामुळे स्वीकाराव्या लागलेल्या हरितक्रांतीचा मूळ पाया हे प्रगत तंत्रज्ञानच आहे. मात्र शेतीक्षेत्राला फायदेशीर ठरणारे



अल्पपरिचय

गत १८ वर्षे डॉ. गिरधर पाटील यांचा शेतकरी आंदोलनात सक्रिय सहभाग राहिला आहे. गत दोन दशकांपासून शेती अर्थशास्त्र, शेतीमाल बाजार आणि प्रगत तंत्रज्ञान या विषयाचा सातत्याने अभ्यास व लेखन सुरू आहे. त्यांच्या निवडक लेखांचा लेखसंग्रह 'लिहिता-वाचता' प्रसिद्ध झाला आहे. नाशिक परिसरातील उत्पादक शेतकऱ्यांना एकत्र आणून केवळ आधुनिक बाजारात उभे राहण्यासाठी त्यांनी 'नाशिक ग्रीन ॲग्रो लिमिटेड' कंपनी स्थापली आहे. वैद्यकीय सल्लागार म्हणूनही ते ३२ वर्षांपासून कार्यरत आहेत.

हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना हवे आहे किंवा नाही हे त्यांनी ठरविण्यापेक्षा इतर घटकच ठरवितात. त्यामुळे आज जनुकीय वाण क्षेत्रामध्ये जी काही घोडदौड चालू आहे, त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत नाही. भारतीय शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान सहज उपलब्ध होईल हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**प्रश्न : खुल्या बाजार व्यवस्थेसमोर कोणते अडथळे आहेत?**

**उत्तर :** दलाल, व्यापारी, अडते या घटकांना कुठलाही अटकाव न राहिल्याने त्यांची आर्थिक, राजकीय ताकद वाढली. बाजारात कुठलेही बदल न होऊ देण्यात त्यांची ताकद दिसून येते. दुर्दैवाने राज्यकर्त्यांनाही बाजार स्वातंत्र्याचे मोल न समजल्यामुळे शेवटी जागतिकीकरण स्वीकारताना भारत सरकारने दिलेल्या कबुलीजबाबामध्ये शेतकऱ्यांना बाजारस्वातंत्र्य नसल्याचे जाहीर केले गेले. जागतिक व्यापार संस्थेशी शेतीबाबतीत जो काही करार झाला, त्यामध्ये भारतीय शेतीमाल बाजारातील हा एकाधिकार संपुष्टात आणून हा बाजार उत्पादक व ग्राहक यांच्या हितासाठी खुला, मुक्त करावा असे एक महत्त्वाचे कलम आहे. या कलमानुसार केंद्र सरकारला २००१ मध्ये एक 'मॉडेल ॲक्ट' स्वीकारावा लागला, मात्र त्याची अंमलबजावणी राज्यांवर सोडल्यामुळे महाराष्ट्रासकट बऱ्याचशा राज्यांत हा कायदा स्वीकारायला आठ-दहा वर्षे लागली. शेतीमाल बाजार खुला करण्यासाठी 'मॉडेल ॲक्ट' स्वीकारताना ज्या घटकांविरोधात लढा द्यायचाय, त्यांच्याचकडून हरकती मागवल्या गेल्या. हे म्हणजे एखाद्या चोराला पकडल्यानंतर आम्ही तुला शिक्षा करणार, त्यावर तुझी हरकत कळव, असे सांगण्यासारखेच. या बाबतीत सरकारने फक्त आदेश जाहीर करणेच महत्त्वाचे होते. आता हरकती मागवल्यामुळे या सर्व एकाधिकार प्राप्त घटकांना न्यायालयात जाण्याची संधी मिहाली. त्यामुळे चांगल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्यामध्ये आणखी काही वर्षे विनाकारण निघून जाण्याची शक्यता आहे.

**प्रश्न : बदलत्या काळात शेतकरी संघटनांच्या भूमिकाही बदलल्यात?**

**उत्तर :** बदलत्या आर्थिक, राजकीय वातावरणात शेतकरी संघटना आपल्या परीने काम करीत आहेत, मात्र शेतकऱ्यांनी आपला वेळ, ऊर्जा शेती पिकविण्यात घालवायची की आंदोलनात, हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो. आजवरच्या शेतकरी आंदोलनांबाबतीत सरकारची भूमिका लक्षात घेता, यातून फारसे काही निष्पन्न झालेले दिसत नाही. त्यामुळे शेतकरी स्वतःच या आंदोलनांबाबत साशंक आहे. आंदोलनात जायचं म्हणजे लाठ्या, गोळ्या झेलायच्या, एवढं करूनही पदरात काही पडणार नसेल तर अशा आंदोलनांच्या बाबतीत पुनर्विचार करण्याची अधिक गरज आहे. तशी वेळ आली आहे. व्यक्तिगत हेवेदावे, राजकीय ईर्षा आणि सत्तासंघर्षामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा वापर शिडीप्रमाणे करून आपली उद्दिष्टे साध्य करता येतात का? अशाच प्रयत्नांमध्ये तरी आज शेतकरी संघटना व्यग्र झालेल्या दिसतात. यामुळेच सर्वसामान्य शेतकऱ्यांचा त्यांच्यावर विश्वास कमी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे पूर्वीसारखीची आंदोलने आज होत नाहीत.

**प्रश्न : प्रश्न सुटण्यासाठी उपाय?**

**उत्तर :** भारतातील शेतीमाल खुला करावा. आयात-निर्यातीवरील बंधने हटवावीत. जागतिक बाजारात भारतीय शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे व्यापार करण्याची मुभा द्यावी. सरकारला जर या क्षेत्रात गुंतवणूक करण्याची क्षमता नसेल, तर खासगी गुंतवणुकीला परवानगी द्यावी. मग ती गुंतवणूक देशांतर्गत असो की, देशाबाहेरून, सरकारने त्यात अडथळे निर्माण करू नयेत. एखादे तंत्रज्ञान चांगले की वाईट, फायद्याचे की तोट्याचे हे ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यासच असावा. त्यांना स्वबळावर हे तंत्रज्ञान वापरू द्यावे.

**प्रश्न : तरुण पिढीसमोरील आव्हाने?**

**उत्तर :** आज शेतीक्षेत्राची परिस्थिती पाहिली तर सगळे मुद्दे नकारार्थी ठरतात. अत्यंत निराशेचं वातावरण आहे. शेतकऱ्याची तरुण मुले ज्यांनी या क्षेत्राला आव्हान म्हणून स्वीकारलय, त्यांच्यासाठी शेती फायद्याची ठरावी, असा कुठलाही संकेत आम्ही, आमचे सरकार, आमचे राजकारणी धोरणातून दिसू देत नाहीत, याचं वैषम्य वाटते. या पिढीच्या पाठीवर थाप मारून 'फक्त लढ म्हणा' अशा आश्वासक वातावरणाची गरज आहे, ते आम्ही कधी देणार, हा कळीचा मुद्दा आहे!

*(साभार : दै. ॲग्रोवन रविवार, २२ एप्रिल २०१२)*

■■

# मदत नव्हे संकट!



चेतन भगत

कर्जाच्या कुबड्यांवर आधारित तुटीचे अंदाजपत्रक सादर करणाऱ्या आपल्या सरकारचा आर्थिक व्यवहार पाहता त्यांच्याकडे पैशांची काही चणचण आहे असं वाटतंच नाही. आपल्या नागरिक उड्डयन मंत्रालयाने अशातच एअर इंडियासाठी तीस हजार कोटी रुपयांची एक 'बचाव योजना' जाहीर केली आहे. यापूर्वी अर्धा डझन अशाच 'बचाव योजना' अपयशी ठरल्यानंतरची ही आणखी एक योजना आहे. मात्र यावेळी मोठ्या कौशल्याने त्यांनी आशादायक चित्र उभं केलं आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे यावेळी सर्व काही ठीक ठाक राहिलं तर येत्या दहा-पंधरा वर्षांत फायद्यात हा व्यवसाय चालेल या आशेवर मदत दिली जात आहे ती मात्र आज!

यावर काही प्रतिक्रिया मात्र उमटल्या नाहीत. मी काही विमान व्यवसाय क्षेत्रातला तज्ज्ञ तर नाही; पण एका बँकेच्या घाट्यात काम करणाऱ्या कर्ज विभागात काम केलेलं आहे आणि माझ्या या बँकेने अशाच कठीण प्रसंगांतून जात असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली होती. मी हे मात्र खात्रीपूर्णरीत्या सांगू शकतो की, एअर इंडिया कधीच नफा कमावू शकणार नाही आणि कर्जाची परतफेडही करू शकणार नाही. आताच एअर इंडियावर सदुसष्ट हजार कोटी रुपयांचं कर्ज आहे. जगातल्या कुठल्याही विमान कंपनीवर एवढं कर्ज असणं म्हणजेच ती कंपनी बंद करण्यायोग्यच समजायला पाहिजे. आजच्या बाजारातील व्यवहाराचा विचार करता कर्जावरील केवळ व्याजच चुकवण्यासाठी एअर इंडियाला वर्षाला ७ हजार कोटी रुपये एवढा फायदा कमवावा लागेल. मूळ व्याजाचे हप्ते चुकवण्याची बात तर दूरच! कंपन्यांचं पुर्नगठन करणं हे काही प्रसंगी योग्य असतंही; पण काही कंपन्या मात्र सहजासहजी संकट मुक्त होऊ शकत नाहीत.

एअर इंडियाला मात्र एवढी प्रचंड मदत देऊन वाचवण्याची सर्कस करण्यामागे काही शहाणपण आहे, असं मात्र खचितच वाटत नाही. हां मात्र या कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं काय हा प्रश्न आहे जरूर; पण मग अशाच संकटात सापडणाऱ्या कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या नोकरीचाही प्रश्न असाच असतो की. तर मग अडचणीत सापडलेल्या सर्वच कंपन्यांना शासनानं अनंत काळापर्यंत अशीच मदत करीत राहायचं की काय? बरं या एअर इंडियाला वाचवताना राष्ट्रीय भावनेचा काही प्रश्न आहे, असंही नाही. एअर इंडिया म्हणजे काही भारतीय वायु सेना नाही. विशेषत: अनेक कंपन्या दिल्लीहून गोव्याला प्रवाशांना घेऊन जाण्याची अधिक चांगली सेवा देत असताना केवळ एअर इंडियात बसणं यात काही देशप्रेमाची भावनाही असू शकत नाही.

एवढं सगळं असूनही सरकार मात्र एअर इंडियाला संकटमुक्त करण्याच्या नावाखाली आंधळेपणानं पैशांची उधळण करीत आहे. तीस हजार कोटी रुपयांचा विनियोग शाळा, इस्पितळे आणि सडकांच्या निर्मितीसाठी अधिक लाभदायकरीत्या केला जाऊ शकतो. अशातऱ्हेने मिळालेल्या कर्जांपैकी एका पैचीही परतफेड न करू शकणाऱ्या आस्थापनेला अशा प्रकारे आर्थिक मदत देण्याचा बेजबाबदारपणा केवळ भोळ्याभाबड्या मतदारांच्या देशातच होऊ शकतो. वास्तवात या अशाप्रकारे अनाठायी मदत देण्यामुळे इतर खासगी कंपन्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो आणि त्या अर्थाने खाजगी कंपन्यांवर हा अन्यायही आहे. भांडवलशाहीबाबत दीर्घकाळापासून भारत सरकारचं धोरणं दुटप्पी राहिलेलं आहे. या दुटप्पीपणामुळे खाजगीक्षेत्र आणि उड्डयन क्षेत्राचंही नुकसान झालेलं आहे. मुक्त व्यापारपेठेबाबत सरकारचं धोरण हे त्या क्षेत्रात हस्तक्षेप करून स्वत:चे निर्णय त्यांच्यावर लादणे असंच राहिलं आहे आणि नेमकं ज्यामुळे परदेशी गुंतवणूकदार भारतात पैसा गुंतवायला तयार होत नाहीत आणि समाज उड्डयन क्षेत्रात परकीयांसाठी प्रवेश खुला केला तरी अशा तऱ्हेने पब्लिक सेक्टरमध्ये अनाठायी गुंतवणूक सरकार करणार असेल तर परकीय गुंतवणूकदार गुंतवणूक कशाला करतील?

मग अशा परिस्थितीत सरकार एअर इंडियाला मदत देऊ करण्याचा एवढा अट्टहास करते आहे तो तरी कशासाठी? शेवटी या कंपनीत एवढं आकर्षण आहे तरी काय, ज्यामुळे कर्जाची शाश्वती सरकार देत आहे? एका उदाहरणाद्वारे हे समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. काही वर्षांपूर्वी मी एअर इंडियाच्या विमानानं दिल्ली ते मुंबई असा प्रवास करत होतो. चेकईन काऊंटरवर मला माझा एक मित्र भेटला. दिल्लीत पोस्टिंग असलेल्या एका आयएएस अधिकाऱ्याचा तो मुलगा होता. त्याने त्याच्या वडिलांच्या नावाचा उल्लेख करताच काऊंटरवरचे सर्वच कर्मचारी उठून उभे राहिले. त्याच्याकडे इकॉनॉमी वर्गाचं तिकीट असूनही बिझिनेस क्लास या वरच्या वर्गात बसवण्यात आलं त्याचं तिकीटावर. तो मित्र माझ्यासाठीही ही सवलत मिळवून द्यायला तयार होता; पण तसं करणं मला इष्ट वाटलं नाही म्हणून मी नकार दिला. सरकारी अधिकाऱ्याच्या मुलाचं तिकीट असं अपग्रेड कसं काय केल्या जातं याचं मात्र मला आश्चर्य वाटलं. एका सरकारी अधिकाऱ्याच्या मुलासाठी एअर इंडियाचा स्टाफ एवढा वाकत असेल तर मंत्र्यांच्या बाबतीत कंबरेत किती वाकत असतील याची तर कल्पनाच केलेली बरी!

खाजगी विमान कंपनीचे कुणी कर्मचारी अशा तऱ्हेने सत्तेपुढे झुकत असतील असं मला वाटत नाही. म्हणून तर सरकार एअर इंडियावर एवढं मेहेरबान होत नाही आणि म्हणूनच एअर इंडिया कधीही फायद्यात चालू शकणार नाही. आल्या नेता-अफसर लोकांची एअर इंडिया ही हवेतील जहागीर आहे आणि एअर इंडियाचं अस्तित्वच संपलं तर या नेता-अफसर लोकांनाही सर्वसामान्य माणसांप्रमाणे रांगा लावून उभं राहावं लागेल. त्यांची तिकीटं कुणी अपग्रेड करणार नाही, त्यांना रांगेत उभं राहूनच नाश्ता घ्यावा लागेल आणि त्यांना यायला उशीर झाला तर कुणी विमान थांबवणारही नाही. आपले नेता, ऑफिसर आणि त्यांचे कुटुंबीय एअर इंडियाचे खासमखास ग्राहक आहेत. विशेष दर्जा एन्जॉय करणारे आणि समजा सरकारनं योग्य पाऊल उचलून एअर इंडिया कंपनीच बंद करायचं ठरवलंच तर या बिचाऱ्यांच्या खास 'स्टेटस'चं काय व्हावं? बिझिनेस क्लासमध्ये मिळणाऱ्या अन्नापुढे ६७ हजार करोडचं कर्ज आणि तीस हजार करोडच्या पॅकेजची काय मामलत?

आपले सत्ताधीश आणि नेते हे संवेदनहीन झाले आहेत. त्यांना मिळणाऱ्या सर्व सोयी सवलतींचा उपभोग तर ते पुरा पुरा घेणारच; पण ते सत्याला सामोरं जातील का? आणि सत्य तर हे आहे की, एअर इंडियाला पॅकेज देऊन कंपनीला वर आणण्याची ही खटपट नाही तर कर भरणा करणाऱ्या नागरिकांच्या पैशांवर यांची चैन चालू राहणार आहे. तेव्हा प्रवाशांनो, आपल्या कंबरेचा पट्टा आवळा आणि पैशाचं पाकीट उघडा. तुमचा प्रवास सुखाचा होवो!

*(दि. १९ फेब्रुवारी २०१२ दैनिक भास्करमधील मूळ लेखाचा स्वैरानुवाद)*

**संघटक ब्युरो**

■■



How can we squeeze
more food from a
RAINDROP?
Farming feeds the world, but it depends on vital natural resources. Just consider this: irrigation for agriculture consumes 2/3 of the world's fresh water.
Experts have concluded that agricultural output will need to double by 2050 to feed a growing world. We'll need to get more from each drop of irrigated water.
We'll also need to do more with the solution nature already provides: rain. The challenge for farmers is squeezing the most out of unpredictable rainfall. That requires putting the latest science-based tools in farmers' hands, including advanced hybrid and biotech seeds. Our goal is to develop seeds that significantly increase crop yields and can help farmers use 1/3 less water per unit produced.
Producing more. Conserving more. Improving farmers' lives. That's sustainable agriculture. And that's what Monsanto seeds are all about.
Non-irrigated agriculture produces 60% of the world's food. It will need to do more.
Learn more of the story at ProduceMoreConserveMore.com
MONSANTO
PRODUCING MORE
CONSERVING MORE
IMPROVING FARMERS' LIVES
© 2008 Monsanto Co. Monsanto Imagine and the Vine Design are trademarks of Monsanto Technology LLC.

# राखीव जागांचा पाऊस अन् पटपडताळणीची पडझड

## एक शिक्षकाचे मनोगत

शिक्षण क्षेत्रामध्ये सध्या दोन महत्त्वाचे निर्णय गाजत आहेत. त्यातील मागील वर्षी राज्यभर नांदेड पॅटर्न राबवून सर्व अनुदानित, विनाअनुदानित सरकारमान्य शाळांची पटपडताळणी करण्यात आली. या पटपडताळणीचा निष्कर्ष निघाला तो असा की, ५० टक्क्यांपेक्षा कमी विद्यार्थ्यांची हजेरी असलेल्या शाळांची संख्या राज्यात दीड हजार आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या शाळांवर कारवाई करण्यात येईल असे वारंवार सांगण्यात येत आहे. कारवाई संस्थाचालक, मुख्याध्यापक व शिक्षक या तिघांवरही करण्यात येणार आहे. अंदाजे दीड हजार कोटी रुपयांचे अनुदान या शिक्षण संस्थांनी लाटल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात येत आहे. हाच पैसा शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी किंवा इतर विकासकामांसाठी वापरला असता, तो निव्वळ संस्थाचालकांच्या घशात गेल्याचा आरोप केला जात आहे. देशभर सध्या २ लाख ५० हजार शिक्षकांची आवश्यकता असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याने काही नवीन तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यात सर्व शाळा द्वीशिक्षकी करणे चार किलोमीटरपेक्षा कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षणासाठी दूर जावे लागणार नाही, अशी शाळांची संख्या वाढविणे. वर्गातील विद्यार्थी संख्या ३० पेक्षा कोठेही जास्त नसेल असे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ठेवणे. या तरतूदी आहेत. देशातील राज्यांची संख्या व शिक्षकांच्या अडीच लाख जागांची संख्या यांचा ताळमेळ घातल्यास महाराष्ट्राच्या वाट्यालाच किमान आणखी १५ हजार शिक्षक येऊ शकतात. याचा अर्थ सध्याच राज्यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण कमालीचे बिघडलेले आहे. ग्रामीण भागात पहिली ते चौथीपर्यंत २० विद्यार्थी आणि दोन शिक्षक अशा शेकडो शाळा आहेत. तर थोड्या मोठ्या बाजारपेठांची गावी, तालुक्याची गावे आणि शहरे यांमध्ये एका वर्गातील विद्यार्थी संख्या ७० ते १०० अशी आहे. त्यातूनच १५ हजार शिक्षकांची गरज असल्याचा आकडा पुढे आला आहे. याचा अर्थ पटपडताळणीतून निघालेला निष्कर्ष आणि शिक्षकांची संख्या यांत कमालीची विषमता आहे. शिक्षक संघटनांनीच आता विद्यार्थी संख्येचा प्रश्न उचलून धरणे, सरकारला या जागा भरणे आवश्यक आहे. तरच सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची थोडीफार अंमलबजावणी होईल.

शिक्षकांवरही कारवाई होणार, असे ठामपणे सांगितले जात असले तरी, शिक्षकांचा यात काडीचाही दोष नाही, शिक्षकांच्या जागा भरणे, तुकड्या मिळवणे, नवीन शाळा काढणे हे सर्व संस्थाचालक करीत असतात. वर्गातून नाव काढायचे की नाही, हा अधिकार मुख्याध्यापकांचा असतो. संख्या टिकवण्यासाठी सर्रास शाळेत न येणाऱ्या विद्यार्थ्यांची नावेही पटावर असतात. शिक्षकांना त्यामध्ये काहीही करता येत नाही. अशा वेळी संस्थाचालकांनी लाटलेले अनुदान आणि आपले पद टिकविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेली कसरत याचा भुर्दंड शिक्षकांवर काय म्हणून? कारवाई करायचीच असेल तर ती संस्थाचालकांवरच करायला हवी. मुख्याध्यापकही बिचारे सांगितल्या कामाचे आणि दिल्या भाकरीचे धनी असतात. खरे मालामाल होतात ते संस्थाचालक. त्यांना अनुदानाच्या रुपाने बोगस शाळांचा आणि विद्यार्थ्यांचा सर्व मलिदा आपल्या ताटात ओढता येतो. उलट शिक्षकांनाच नोकरीला लागताना मोठ्या प्रमाणावर पैसे द्यावे लागतात. हा आकडा किमान १० लाख ते १५ लाखांच्या आसपास चालू आहे हे सर्वश्रुत आहे. शिक्षकाची पदविका आणि पदवी घेतलेल्या उमेदवारांची महाराष्ट्रात सध्या मोठी संख्या आहे. सगळीकडेच डी.एड. आणि बी.एड.ची महाविद्यालये काढून आता डी.एड. वा बी.एड.वाल्यांचे वशिला लावून, पैसे देऊनसुद्धा नोकरीचे स्वप्न धुसर झाले आहे. त्यातूनच हा देणग्यांचा आकडा वाढत चालला आहे. अशा वेळी शिक्षकांना त्यात गोवून त्यांच्या नोकरीवर गदा आणणे योग्य ठरणार नाही. या उलट राज्याने त्वरीत किमान १५ हजार जागा भरून मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासूनच करायला हवी.

संस्थाचालकांनीही या पटपडताळणीच्या निष्कर्षावरून ताबडतोब कारवाई करण्याऐवजी त्यांना संधी मिळावी अशी मागणी केली आहे. विशेषतः ग्रामीण भागामध्ये वेगवेगळ्या कारणाने शाळेतील गैरहजेरीचे व गळतीचे प्रमाण हे लक्षणीय असते. सक्तीचा शिक्षणाचा कायदा केला तरीही आर्थिक दुरावस्थेमुळे पालक ७ ते ८ वर्षांपासूनच मुलांना बालमजुरीवर पाठवून त्यांच्याकडून ५०-१०० रुपये रोजाचे काम करून घेतात व कुटुंबाला हातभार लागत असल्याने या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. अशा विद्यार्थ्यांना या कायद्याच्या कोणत्या तरतुदींनी शाळेत आणता येईल हा मोठा प्रश्न शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासमोर सध्या आ वासून उभा आहे. मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्त्या, सायकलींचे वाटप, गणवेश, पुस्तके देणे अशा अनेक सुविधा देऊनही विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती मात्र वाढत नाही ही मोठी समस्या आहे. यासाठी शिक्षकांना जबाबदार धरले जाते. त्यांनी काय करावे, म्हणजे विद्यार्थी शाळेत येतील, हे मात्र कोणीही शिक्षणतज्ज्ञ सांगत नाही.

सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यात विद्यार्थी आणि पालकांवर काय कारवाई करण्याची तरतूद आहे, असे जर तपासून पाहिले तर अशी कुठलीही तरतूद आढळून येत नाही. शिक्षकांच्या हातात असा कुठलाही कायदा किंवा नियम नाही की त्यामुळे ते पालक आणि विद्यार्थ्यांवर काही कारवाई करून त्यांना शाळेत आणू शकतील. परिसरातील एकही विद्यार्थी शालाबाह्य राहू नये, सर्व ७ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना शाळेत आणलेच पाहिजे, अशी सक्ती शिक्षकांवर आहे, विद्यार्थी आणि पालकांवर कारवाईची कोणतीही तरतूद नाही. यातूनच या वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांची नावे हजेरीपटावर असली तरी विद्यार्थी मात्र हजर नसतात. पटपडताळणीतून हेच सत्य उघड झाले आहे; पण तरीही शिक्षकांनाच जबाबदार धरण्यात येत असेल तर ते पुन्हा काहीतरी असाच अव्यवहार्य मार्ग शोधून काढतील आणि आपली नोकरी वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करतील. शिक्षणाची हेळसांड मात्र थांबणार नाही, सक्तीच्या शिक्षणाचा कायदा हा शिक्षकांपर्यंतच अडून जाईल त्या पुढे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून खरोखरच एकही शालाबाह्य विद्यार्थी राहणार नाही, अशी परिस्थिती तयार होणार नाही.

दुसरा महत्त्वाचा निर्णय केंद्र शासनाने नुकताच घेतला. या कायद्यान्वये सर्व शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या कमकूवत विद्यार्थ्यांना २५ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. हा निर्णय क्रांतिकारी असल्याचे व त्याचा भार विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांवर पडणार नसल्याचेही सरकारने म्हटले आहे. मात्र हा निर्णय प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे अत्यंत जिकीरीचे ठरणार आहे. सध्याच अनुदानित शाळांचे वेतनेतर अनुदान गेल्या दहा वर्षांपासून सरकारने दिलेले नाही. आणखी या विद्यार्थ्यांचा भार सरकार कसा पेलणार? ज्या

पान ११ पाहा

# अशी ही बनवा बनवी

अरे तुम्हाला घाबरायला काय झालं? तुम्ही एकटेच थोडी आहात? आमच्याच पटपडताळणीत तुमच्यासारखे लाखात तरी आहेतंच. आता इतक्या लोकांवर कारवाई थोडी होणार आहे? बरं तुमच्यावरंच कारवाई करावी म्हणलं तर आमच्यावर ती कारवाई शेकणारंच. शेण उचललं की त्याच्या संगं माती उचलली जातेच आणि आमचं म्हणालं तर आमच्याही वर कुणी तरी आहे आणि त्यांच्याही वर, आणखी वर तेव्हा घाबरायचं काही कारण नाही. आता एवढं वारं सुटलंच आहे तर दोन घरावरचे पत्रे उडतील एवढंच; पण वारं बंद झालं, की आण परत पत्र टाकून घेतोच की, बस तेवढंच. तेव्हा घाबरायचं काही कारण नाही.

हे बघा, झालं काय की त्या कुणा येड्याच्या डोक्यात काही तरी खुळ आलं अन् हे असं वार सुटलं. त्याला वाटलं आपण काही तरी भलं करत आहोत, देशाचा पैसा वाचवतो आहोत; पण त्याला हे कळत नव्हतं, की जे काय होत होतं ते आम्हाला माहीत नव्हतं असं नाही. उलट आमच्या मुकचं नव्हे तर प्रकट संमतीनंच सारा प्रकार चालला होता. आता ज्या शिक्षकावर या प्रकारामुळे आघात होणार आहे त्यांना तर हे माहीत होतं, की ज्या संस्थेत आपण काम करणार आहोत त्या संस्थेचे अध्यक्ष कुणी असले तरी 'मालक' कुणी लई बडे आहेत. त्यामुळे आपल्याला पूर्ण संरक्षण आहे. म्हणून तर त्यानं पूर्ण विश्वासात नोकरी मिळावी म्हणून शेतीचा तुकडा, विकून आठ-दहा लाखाचा नैवेद्य अध्यक्षांना दाखवला. त्याला हा पूर्ण विश्वास होता, की यातला एक हिस्सा या नाही त्या रूपानं 'मालका'पर्यंत पोहोंचणार आहे. तेव्हा आपल्याला काळजी करायचं काही कारण नाही.

तरीही तुम्हाला भीती वाटते आहे? आम्ही एवढं सांगतो आहोत तरी तुम्हाला भीती वाटते म्हणता? आता काय सांगावं. तुम्हाला भीती वाटते ती पेपरात येणाऱ्या बातम्यामुळे. आता तुम्हीच सांगा, आधी पेपरात बातमी आली होती, ''नांदेडच्या पटपडताळणीत ज्या शाळेत त्रूटी आढळून आल्या त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार.'' त्या बातमीमुळे मोठा भूकंप झाला. खाल्ले लोक अध्यक्षांना भेटले. अध्यक्ष 'मालकांना' अन् तिसऱ्या दिवशी पेपरात परत बातमी ''नोटिसा पाठवू नयेत असे तोंडी आदेश आले.'' हा चमत्कार कसा काय घडला असेल बर? राजेहो, तुमची आम्हाला काळजी आहे हा याचा अर्थ आहे की नाही? तरीही तुम्हाला भीती वाटते म्हणता?

आता काय सांगावं बप्पा! अहो, आम्ही ऑलरेडी बचाव मोहीम सुरू केली आहे हे लक्षात घ्या. आम्ही दोन आघाड्यावर काम करतो आहोत. शिक्षक आमदार आमचेच. त्यांनी ऑलरेडी ''या संपूर्ण मोहिमेत बिचारा शिक्षक विनाकारण भरडला जाणार आहे आणि त्याच्यावरचा अन्याय आम्ही सहन करणार नाही,'' ही नवीन निवडणूकीची भाषा सुरू केली आहे. दुसरीकडे आमच्याच चेल्या चपाट्यांची एक बैठक बोलावली आहे आणि त्यांच्याकडून येत्या जुलैपासून शाळेवर बहिष्कार असा धमकीवजा अल्टिमेटम दिला आहे. त्यांचा तो अल्टिमेटम ऐकून आम्हाला तर भरत आलं. आपल्या बेईमानीचं एवढं निर्लज्ज प्रदर्शन होत असलेलं पाहून आमची राजकिय परंपरा चालवायला नवीन पिढी किती तयार होत आहे याचा आम्हाला नितांत आनंद वाटतो आहे. आम्ही तर त्यांना सूचवणार आहोत, की पुढच्या बैठकीत आम्ही मागणी करणार आहोत, की 'वर्गात विद्यार्थी संख्या असो वा नसो, आम्हाला आजच्याच दराने अनुदान हे मिळालेच पाहिजे. नाही तर, नाही तर, नाही तर काय हे आत्ताच आम्हाला सुचत नसलं तरी पुढच्या आंदोनलापर्यंत आम्ही ते शोधून ठेवू. हां, आम्ही एवढं मात्र सूचवून ठेवतो, की या पटपडताळणी मोहिमे मागे ग्रामीण लोकांच्या विरोधी लॉबी कार्यरत आहे. आम्ही करत असलेल्या कामामुळे ग्रामीण विभागात शिक्षणाचा जो प्रभाव निर्माण झाला त्यामुळे भांडवलशाही वृत्तीच्या बाबू लोकांच्या पोटात दुखायला लागलं. त्यामुळे या पटपडताळणीच्या नावाखाली ग्रामीण विभागाला परत मागच्या शतकात ढकलण्याची तयारी चालली आहे; पण आम्ही हा अन्याय सहन करणार नाही. इतउपरही आमच्या विरुद्ध कारवाई केली गेली तर आम्ही मंत्र्यांना गावबंदी करू' इत्यादी इत्यादी. कशी काय वाटली आमची योजना?

तरीही भीती गेली नाही म्हणता. आता काय करावं बप्पा! बरं समजा इतउपरही नोटिसा सुटल्या तर तेवढ्यानं काम भागणार आहे का? आपल्याकडे राजे हो नियमाची आंमलबजावणी करण्याचा मार्ग एवढा वळणा वळणाचा आहे, की शेवटचं टोक दिसत असून सुद्धा तिथपर्यंत पोंचायला वर्षांनुवर्षांचा काळ लागतो. अफझल गुरू नावाच्या माणसाची तुम्हाला आठवण आहे का? त्याला फाशी सुनावली या घटनेला आता किती वर्ष झाली असतील? झाली का फाशी? अफझल तर जाऊद्या हो. तो कसाब तुम्हाला आठवतो का? कसाब म्हणजे जनावर कापणारे कसाब नाही हो, माणसांना कापणारा कसाब. त्याला फाशी सुनावल्याला किती दिवस झाले? आता यापुढे राष्ट्रपतीकडे दयेला अर्ज तो करणार. मग ते राष्ट्रपती मुख्यमंत्र्यांचा अहवाल मागवणार, मुख्यमंत्री येऊ घातलेल्या निवडणुकीचा कानोसा घेणार. या फाशीमुळे कुणाच्या 'भावना' दुखावल्या जाऊन आपल्या सीटा कमी होणार का याचा विचार करणार. मग वेळ प्रसंग पाहून अहवाल द्यावा, की नाही याचा खल करणार मग, मग, मग लोक विसरून जाणार. कुणी तरी त्या संदर्भात मिडीयाकडे जाणार. मग कुठे अहवाल राष्ट्रपतीकडे प्रलंबित आहे, की मुख्यमंत्र्याकडे याची चर्चा होणार. मग त्या चौकशीसाठी समिती नेमण्यात येणार. त्या समितीचा अहवाल विधानसभेत सादर करावा किंवा काय याची चर्चा, त्याबाबत ॲडव्होकेट जनरलचं मत मागवणार. तोपर्यंत ते प्रकरण एवढं शिळं झालेलं असतं, की लोक ते विसरूनही जातात. तोपर्यंत जल संपदा खात्याचं एखादं नवीन लफडं बाहेर येणार. त्याची जोरदार चर्चा होणार मग मग मग...

आता मला सांगा एवढ्या मोठ मोठ्या प्रकरणात जर ही अशी अवस्था होत असेल तर आपल्या पटपडताळणीच्या प्रकरणाला लांबवण काय अवघड आहे बरं? तरीही तुम्हाला भीती वाटते म्हणता? आता तुमची समजूत कशी घालावी बप्पा!

हे बघा, नीट कान देऊन ऐका, आता आम्ही काय करणार आहोत ते लक्षात घ्या. आधी तुम्हाला शो कॉज नोटीस देणार. काय म्हणून? की पटपडताळणीत तुमच्याकडे पन्नास टक्क्यावर संख्या 'बोगस' आढळली. त्याचं स्पष्टीकरण द्या. त्यावेळी तुम्ही काय करायचं, पटपडताळणीच्या अहवालाची प्रत मागवायची. ''पटपडताळणीचा अहवाल मिळाल्याशिवाय आमच्या विरुद्ध काय आरोप आहेत हे कळणार नाही आणि त्याशिवाय आम्ही उत्तर देऊ शकणार नाही.'' तेव्हा तुमच्या वतीने तुमचं प्रतिनिधी मंडळ आणि आमचे संबंधीत बाबू लोक एकत्र बसून उत्तर तयार करतील. ''आपण मागणी केलेला अहवाल अद्याप प्राप्त नाही. तो संबंधीत ऑफिसातून प्राप्त झाल्यावर आपणाला प्रत देण्यात येईल.'' या पत्रोपत्रात चार सहा महिने जातील. त्यापुढे

पान ११ पाहा

# महाराष्ट्राची महाघसरण

येत्या १ मे रोजी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला ५२ वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली देवाच्या आळंदीला निघालेला महाराष्ट्र यशवंतरावांच्याच कराड गावचे सुपुत्र असलेल्या पृथ्वीराज चव्हाणच्या नेतृत्वाखाली चोराच्या आळंदीला कसा पोचला ही वाट चुकलेल्या महाराष्ट्राची व्यथा या लेखात मांडली आहे.



सुधाकर जाधव

देशापेक्षा श्रेष्ठ समजणे हे भारतीय संघराज्याच्या घटक राज्यांचे व्यवच्छेदक लक्षण आहे आणि या सर्व घटक राज्यांत आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपण आघाडीवर आहोत ही समजूत ज्या राज्यात तळागाळातील लोकापर्यंत रुजली आहे ते राज्य अर्थातच महाराष्ट्र आहे! हा अभिमान स्वपराक्रमामुळे आहे असा मात्र कोणाचाच दावा नाही. ही अर्थातच महाराष्ट्रीयन लोकांच्या पूर्वजांची पुण्याई. पेशवाईचा अप्रिय कालखंड वगळता रयतेचा राजा शिवाजीपासून नामदेव-तुकाराम आणि त्यानंतरचे फुले-शाहू महाराज यांच्या पराक्रमाने महाराष्ट्र राज्य आघाडीवर आले होते. महाराष्ट्राकडे नेतेपण आले ते यांच्यामुळे; पण नेतेपद टिकवायचे असेल तर पूर्वजांच्या पराक्रमाच्या गाथा उरी कवटाळून बसून चालत नाही. त्या पराक्रमाची परंपरा पुढे चालवावी लागते. वर्तमान घडविण्याऐवजी इतिहासात रममाण होणारी जनता आणि नेतृत्व असेल तर उज्ज्वल इतिहासाकडून अंधाऱ्या वर्तमानाकडे वाटचाल होते. महाराष्ट्राच्या बाबतीत नेमके हेच घडले आहे. पराक्रमशून्य श्रेष्ठत्वाच्या अहंगंडामुळे महाराष्ट्रातील लोकांना काम धंद्यासाठी दुसऱ्या राज्यांत जाणे नेहमीच कमीपणाचे वाटत आले आहे आपली शाखा दुसरीकडे नसल्याचा अभिमानही यातूनच निर्माण झाला आहे. आपण दुसरीकडे जात नाही, मग दुसऱ्यांनी आपल्याकडे का यावे या भावनेचा उगमही आपले राज्य आघाडीचे आणि आघाडीवर असल्याच्या समजुतीत सापडेल. देशभरामध्ये परप्रांतीयांच्या बाबतीत रोष असणारे मोठे राज्य कोणते हे कोणालाही विचारले तर त्यांचे उत्तर चुकण्याची शक्यताच नाही. एका सुरात सर्वांचे उत्तर महाराष्ट्र राज्य हेच येईल. देशातील अन्य घटक राज्यांबद्दल ज्या बातम्या येतात ते विविध क्षेत्रात त्यांची कामगिरी सुधारत असल्याची; पण महाराष्ट्राच्या बाबतीत नेमक्या उलट्या बातम्या येतात. प्रत्येक क्षेत्रात होत असलेली पिछेहाट हीच महाराष्ट्राची आधुनिक ओळख बनली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या ५२ वर्षांत आम्ही मोठा पल्ला गाठला खरा पण तो शिखरावरून तळ गाठण्याचा !

### शेती रसातळाला

महाराष्ट्र आजही अनेक राज्यांच्या तुलनेत आघाडीवर आहे, पण त्याला प्राप्त झालेली ही आघाडी विपरीत बाबतीत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत महाराष्ट्राने घेतलेली आघाडी कोणत्याच राज्याला मोडता येणार नाही इतकी मोठी आहे. शेतीक्षेत्राचे वाटोळे देशभरातच होत आहे; पण त्या क्षेत्राची कंबर मोडण्यातही महाराष्ट्र आघाडीवर आहे, धान्य उत्पादनासंदर्भात जे ताजे अंदाज जाहीर झाले आहेत ते लक्षात घेतले तर महाराष्ट्राची वाटचाल इतर राज्यांच्या तुलनेत उलट्या दिशेने होत असल्याचे दिसून येईल. संसदेत जो अधिकृत अंदाज जाहीर करण्यात आला आहे त्यानुसार देशात गहू आणि तांदळाचे बंपर उत्पादन होणार आहे. या दोहोंच्या उत्पादनात गतवर्षी पेक्षा अधिक वाढ अपेक्षित आहे. डाळी वगळता नगदी पिकांच्या उत्पादनातही भरीव वाढीचा अंदाज आहे; पण हे झाले देशभराचे सरासरी चित्र. महाराष्ट्राचा ताजा अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी जे आर्थिक सर्वेक्षण सादर करण्यात आले होते त्यातून महाराष्ट्राच्या आजच्या स्थिती वर झगझगीत प्रकाश पडतो. या आर्थिक सर्वेक्षणात महाराष्ट्रात अन्नधान्याच्या उत्पादनात या वर्षी तब्बल २३ टक्क्यांनी घट होणार आहे. गेल्यावर्षीसुद्धा महाराष्ट्रातील अन्नधान्य उत्पादनात अशीच प्रचंड घट झाली होती हे लक्षात घेतले आणि गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी २३ टक्के घट झाली असे गृहीत धरले तर प्रत्यक्षात शेती उत्पादनात महाराष्ट्राने निचांकी पातळी गाठली असे म्हणण्याशिवाय प्रत्यवाय नाही. याचे खापर अनियमित पावसावर फोडण्यात येत असले तरी वीज, पाणी, बियाणे, खते अशा शेतीशी निगडीत मूलभूत बाबींकडे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष कारणीभूत आहे. ग्रामीण भागात १८ तास वीज नसणे हा नियम बनून गेला आहे. वाढत्या नागरीकरणाने शेतीसाठीच्या पाण्याचा वापर पिण्यासाठी वाढला आहे. शिवाय उद्योगाच्या बाबतीतला क्षेत्रीय असमतोल दूर करण्याच्या नावाखाली कोणत्याही नव्या मूलभूत सुविधा निर्माण न करता मागासलेल्या भागात उभे राहणारे उद्योग शेतीला पूरक न ठरता शेतीची हानी करणारे ठरत आहेत. उद्योगासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते आणि त्याची स्वतंत्र सोय केली पाहिजे हे ना आमच्या नियोजनकारांनी ध्यानी घेतले ना आमच्या राज्यकर्त्यांनी. परिणामी शेतीचे पाणी पिण्यासोबतच उद्योगासाठी पळविले जाऊ लागले. महाराष्ट्रात शेतीक्षेत्राला आसमानी संकटासोबत अशाप्रकारच्या सुलतानी संकटांना मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागत असल्याने शेतीक्षेत्राची वाताहत झाली आहे.

### भूखंड केंद्रीत विकास

शेतीक्षेत्रापेक्षाही महाराष्ट्र औद्योगिक राज्य म्हणून ओळखले जायचे; पण महाराष्ट्राची ही ओळख आता मिटत चालली आहे. वाढत्या नागरीकरणाने जमिनीचे भाव आकाशाला भिडले असल्याने आधीच्या शहर केंद्रीत उद्योगांना उद्योग चालवून उत्पादन घेण्याच्या कटकटीपेक्षा उद्योग बंद करून उद्योगाच्या जमिनीचा व्यापार करण्यात प्रचंड फायदा दिसू लागल्याने जुने उद्योग पद्धतशीर बंद पडत आहेत. दुसरीकडे कायदा आणि सुव्यवस्थेची एकेकाळी ख्याती असलेले हे राज्य अराजकाकडे वाटचाल करू लागल्याने नव्या उद्योगांनी महाराष्ट्राकडे पाठ फिरविली आहे. जुने उद्योग मोडीत निघण्याचे प्रमाण वाढल्याने आणि नव्या उद्योगासाठी राज्यात कोणतीच अनुकूलता नसल्याने महाराष्ट्रात शेती इतकीच औद्योगिक क्षेत्रात ही घसरण होऊ लागली आहे. भूखंड हडप करण्यासाठी मात्र कागदोपत्री नव्या उद्योगात वाढ झाल्याचे दिसेल. भूखंडाचा व्यापार आणि व्यवहार ही आता महाराष्ट्राची देश पातळीवर नवी ओळख निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील केवल राजकारणीच नाही तर जे जे म्हणून कोणी प्रभावशाली व्यक्ती आणि संस्था आहेत त्या सर्वांचा भूखंड व्यवहारात हितसंबंध गुंतलेला आहे असे आढळून येईल. उद्योगासाठी भूखंड नव्हे भूखंडासाठी उद्योग, सावित्रीबाई, जोतीराव, कर्वे किंवा कर्मवीर भाऊराव पाटलांचे स्वप्न साकारण्यासाठी नव्हे तर भूखंडासाठी शिक्षण संस्था, लोकप्रबोधनासाठी आणि बातम्यासाठी वृत्तपत्र नव्हे तर भूखंडासाठी वृत्तपत्र,

रंजल्या गांजल्यांची सेवा करण्यासाठी स्वयंसेवी संस्थां इतिहास जमा होऊन मोक्याचे भूखंड हडपण्यासाठी मोठमोठे ट्रस्ट आणि फाउंडेशन अशा भूखंड केंद्रीत विकास दौडीत महाराष्ट्र अग्रेसर होत आहे. अशा 'सेवा' क्षेत्रातील अनुत्पादक व्यवसायात लाखो कोटींची दररोज उलाढाल होत असल्याने शेती आणि उद्योग या दोन्हींसाठी पैशांचा ठणठणाट आहे. अनुत्पादक व्यवसायातील आकर्षक परतावा आणि ऐषाराम एकीकडे, तर दुसरीकडे उत्पादक व्यवसायात तोटा आणि फरफट हे महाराष्ट्राच्या विकासाचे खरेखुरे चित्र आहे. गुंडगिरी आणि माफिया यांचा उदय आणि विकास ही अनुत्पादक व्यवसायातील अपरिहार्य फलनिष्पत्ती आहे. गुंडगिरी आणि माफियागिरीच्या विकासासाठी राजकारणाइतकी सुपीक जमीन आणि धर्म, भाषा, संप्रदाय आणि प्रादेशिक वाद याच्याइतकी चांगली औजारे दुसरी नाहीतच. यशवंतराव चव्हाणांच्या काळात देवाच्या आळंदीकडे निघालेला महाराष्ट्र ५२ वर्षानंतर चोराच्या आळंदीत कसा पोचला याचे उत्तर आपल्याला महाराष्ट्राच्या वाटचालीतून मिळते.

**मोबाईल आणि वाहनांचा महाराष्ट्र**

महाराष्ट्रात घरोघरी संडास नाहीत पण मोबाईल आहेत, गावोगावी चुलीच्या धुरा इतकेच धूर फैलावणारे वाहने आहेत याला तंत्रज्ञानाची ताकद हे जितके कारण आहे तितकेच कारण लोक उत्पादक व्यवस्थेत गुंतलेले नसणे हे आहे. आपले काम इमाने इतबारे करण्यापेक्षा त्यातून दलाली कामासाठी कसा वेळ मिळेल याचा प्रबळ विचार महाराष्ट्रात होतो. म्हणूनच लाखाच्या वर पगार घेणारे शिक्षक-प्राध्यापकांसारखे नोकरदार शाळा-महाविद्यालयाचा निर्धारित वेळ कधी संपेल याची आतुरतेने वाट पाहत असतात. दलालीच्या दलदलीत महाराष्ट्र कसा खोलवर फसला आहे हे यावरून लक्षात येईल. उत्पादन व्यवस्था विस्कळीत होऊन मोडीत निघायला लागली, की विकास ठप्प होतो आणि विकासाचा प्रवाह थांबला, की तयार होणाऱ्या डबक्यात रोग पसरविणारे जंतू निर्माण होतात तेच महाराष्ट्राचे झाले आहे. पुरोगामी महाराष्ट्राची जागा प्रतिगामी आणि रोगट महाराष्ट्राने घेतली आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे विचारवंत आणि थोर व्यक्तिमत्त्व ज्या क्षेत्रात निवडणूक लढले तिथे खैरलांजीसारखे प्रकार घडतात, तर जोतिबा-सावित्री, बहिणाबाई यांच्या जिल्ह्यात 'ऑनर किलिंग'च्या नावाने कोवळ्या मुलींची हत्या होते. मुंबईसारख्या प्रगत औद्योगिक नगरीत आता 'ऑनर किलिंग'सारखे प्रकार होऊ लागले आहेत विकासातील प्रवाहीपण संपून त्याचे डबके झाल्याचा हा परिणाम आहे. परप्रांतीयांमुळे हे घडते अशी उथळ आणि सोपी मांडणी केली जाते आणि ती आपल्याला पटते याचे कारण महाराष्ट्राच्या विनाशाची जबाबदारी झटकून आपल्याला मोकळे व्हायचे असते. शेती आणि उद्योग यांना अनुकूल वातावरण निर्माण केल्याशिवाय महाराष्ट्राची सुरू असलेली घसरण थांबणार नाही. त्यासाठी महाराष्ट्राला गरज आहे विकासाची दृष्टी आणि ध्यास असलेल्या नेतृत्वाची. भूखंडाची आस आणि ध्यास बाळगून त्यावर गिधाडासारखी नजर ठेवून असलेल्या पक्ष-विपक्षातील राजकीय पिलावळीचे हे काम नव्हे.


**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/


■■

**राखीव जागांचा पाऊस.... पान ८ वरून पुढे**

शाळांना सरकारचे कुठलेही अनुदान नाही, केवळ विद्यार्थ्यांच्या फीवर शाळा चालतात, त्या शाळांना जर अनुदान देताना अशी हेळसांड झाली तर त्यांच्या गुणवत्तेवरही याचा परिणाम होऊ शकतो. सध्या खासगी शाळा व महाविद्यालयांचे पेव फुटले आहे, हे सर्व उच्चभ्रू वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि भरमसाट फीस देऊन चालवली जाणारी केंद्रे आहेत. गरीब परंतु हुशार विद्यार्थीसुद्धा अशा शाळांमध्ये जावेत आणि शिक्षणामध्ये समता येऊन श्रीमंत लोकांनी तयार केलेली वर्गविग्रहाची कोंडी फोडली जावी, असा उदात्त हेतू या २५% राखीव जागा देण्यामध्ये असल्याचे सरकारने म्हटले आहे. खरे तर सरकार शिक्षणामध्ये पूर्वीपासूनच गुंतवणूक करीत आले आहे, आज मात्र परिस्थिती अशी झाली आहे की, लोक जिल्हा परिषदा आणि नगर पालिका, महानगर पालिकांच्या शाळांचे नावसुद्धा काढू नका असे म्हणू लागले आहेत. थोडीशी आर्थिक परिस्थिती सुधारली की, अगदी खेड्यापाड्यातील लोकही कुठल्यातरी छोट्यामोठ्या रिक्षा, टमटमच्या साहाय्याने आपल्या मुलांना दोन-चारशे रुपये महिना फीस भरून जवळच्या खासगी शाळेत अन् शक्य झाले तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालू लागले आहेत. सरकारने आपणच चालवलेल्या शाळा धडाधड बंद पडत असताना स्वतःचा पैसा खर्च करून आपल्या मुलांना शिकविणाऱ्या पालकांवर हा भुर्दंड टाकण्याऐवजी सरकारी शाळा अतिशय अद्ययावत आणि उत्तमरीतीने खेड्यापाड्यातसुद्धा उभारल्या असत्या, तर हा प्रश्न निर्माण झाला नसता. सरकारी शाळा या खासगी शाळांना उदाहरण ठरतील अशी सरकारकडून अपेक्षा आहे. हे सोडून आपल्या शाळा बंद पाडून आता जे लोक आपल्या खर्चाने उत्तम शाळा चालवीत आहेत. त्यातही राखीव जागांच्या निमित्ताने बोट घालण्याचा करंटेपणा सरकारने केला आहे. आपली जबाबदारी झटकून इतरांवर ही जबाबदारी टाकण्याचा बेजबाबदारपणा करून शिक्षणाच्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रातून सरकार हळूहळू काढता पाय घेत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे.

■■

**अशी ही बनवा बनवी.... पान ९ वरून पुढे**

तुम्हाला अहवाल पाठवला जाईल. तो एवढा गिचमीड असेल, की तुम्हाला वाचता येणार नाही. खरं सांगायचं म्हणजे तुम्हाला तो अहवाल वाचता येऊ नये हीच तर आमची योजना राहील. त्यावर तुम्ही आम्हाला कळवायचं, ''आपण पाठवलेला अहवाल हा वाचण्यापलीकडे आहे. सबब आम्ही उत्तर देण्यास असमर्थ आहोत. कृपया आपण सुवाच्य अक्षरातील अहवाल पाठवावा जेणे करून आम्ही उत्तर देऊ शकू.'' या पत्रोपत्रात परत काही महिन्यांचा अवधी जाणार. मग तुम्हाला अहवाल मिळणार. तेव्हा तुम्ही आम्हाला उत्तर द्यायचं. ''त्या दिवशी अमुक अमुक कारणामुळे विद्यार्थी गैर हजर राहिले होते, आपण परत एकदा पटपडताळणी करावी.'' त्यानंतर आम्ही फेर पटपडताळणीचा दिवस तुम्हाला काही महिने आधी कळवू. मात्र आम्ही काळजी घेऊ की सर्व शाळांची तपासणी एकाच दिवसात न करता पाळी पाळीने करू. त्यामुळे तुम्हाला विद्यार्थी 'मॅनेज' करणे सोपे जाईल आणि तुमची पटपडताळणी 'यशस्वी' रित्या पार पडेल आणि मग मात्र तुम्हाला रोकून ठेवलेला निधी. अंशतः मिळेल. बाकी अंशाचा काय होणार हे तर तुम्हाला आणि आम्हाला माहित आहेच. नाही तरी त्यासाठीच तर ही सारी बनवा बनवी.

आता तरी भीती गेली का?

■■

# असा आहे आमचा शेतकरी

शेतकरी समाजाची स्थिती अत्यंत दयनीय व हलाखीची आहे, यातून काहीतरी मार्ग निघायलाच हवा. त्यासाठी आपले सर्वस्व पणाला लागले तरी चालेल, अशातऱ्हेची मानसिक बैठक असणाऱ्या काही मंडळींना तशी गरज वाटायला लागली आणि त्यातूनच शेतकरी संघटनेचा उदय झाला. शेतकऱ्यांचे लाचारीचे जिणे संपवून त्यांना देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगता यावे याकरिता पक्ष, धर्म, जात वा इतर कोणत्याही भेदाभेदांचा अडथळा न येऊ देता प्रयत्न झाले पाहिजेत, असे ज्यांना-ज्यांना वाटले ते शेतकरी संघटनेचे पाईक झालेत.



**गंगाधर मुटे**

मुंबईतील चतुरंग प्रतिष्ठान संस्थेचा या वर्षीचा सामाजिक क्षेत्रासाठी असलेला जीवनगौरव पुरस्कार शेतकरी संघटनेचे प्रणेते श्री. शरद जोशी यांना प्रदान करण्यात आला. मुलुंड, मुंबई येथील कालिदास नाट्यगृहात १८ डिसेंबर २०१२ रोजी संपन्न झालेल्या भव्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांनी सुमारे पाच मिनिट उभे राहून प्रचंड टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट करून मा. शरद जोशींना मानवंदना दिली. त्या क्षणापासून सतत एक विचार मनात घोळतोय, अनेक प्रश्न मनात निर्माण होतात ज्याची उत्तरे मिळत नाहीत. उत्तर मिळाल्यासारखे वाटत असतानाच पुन्हा एक नवीन प्रश्न निर्माण होतो.

त्या सभागृहात उपस्थित असलेल्या सुमारे अडीच हजार उपस्थितांपैकी बहुतांश शहरी आणि मुख्यत्वेकरून मुंबईकरच होते. ज्यांचा कधीही शेती विषयाशी दूरान्वयानेही संबंध आलेला नव्हता. शेतीमालाला रास्त भाव मिळाले तर त्याचा त्यांना लाभ मिळण्याऐवजी फटकाच बसणार होता. दूध आंदोलनाने दुधाचे भाव वाढले तेव्हा त्यांच्याच खिशातून जास्तीची रक्कम खर्च झाली होती. उसाचे दर वाढून साखर महाग झाली तेव्हा त्यांच्याच घरगुती बजेटवर आघात झाला होता. शेतमालास उत्पादनखर्चानुसार रास्त भाव द्यायच्या प्रयत्नापोटी अन्नधान्याचे दर वाढले तर त्याचा तडाखाही त्यांनाच बसणार होता आणि तरीही ही शहरी मंडळी शरद जोशींच्या व्यक्तिमत्त्वासमोर नतमस्तक होऊन मानवंदना देण्यासाठी पाच मिनिटे उभे राहून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करीत होती. याचे कारणही स्पष्ट होते; की त्यांना शरद जोशी आणि त्यांचे कर्तृत्व कळले होते.

मात्र याउलट स्थिती ग्रामीण महाराष्ट्रात पाहायला मिळते. शेतीमालाला रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम घेऊन ज्यांच्यासाठी शरद जोशींनी उभे आयुष्य खर्ची घातले, संसाराची राखरांगोळी होत असतानाही अविचल राहून ऋषितुल्य जीवन जगून नेटाने शेतकरी चळवळ पुढे नेली, अडगळीत पडलेला शेतीच्या अर्थवादाचा विषय कृतिशीलतेने केंद्रसरकारच्या अजेंड्यावर आणून ठेवला, त्या शरद जोशींविषयी ग्रामीण महाराष्ट्र उदासीनता का दाखवतो? असा प्रश्न वारंवार पडणे स्वाभाविक आहे. ज्या शेतकरी संघटनेने अनेकदा आंदोलने करून शेतमालाला भाव मिळवून दिले, शेतकऱ्याकला स्वाभिमानाने जगायला शिकविले, दोनदा हजारो कोटी रकमेची कर्जमुक्ती मिळवून दिली त्या संघटनेला राजकीय यश मिळवून देताना शेतकरी समाज कंजूषी का दाखवतो, असाही प्रश्न उपस्थित होऊन मनात निराशा येणे स्वाभाविक आहे. मात्र ग्रामीण महाराष्ट्राला शरद जोशी आणि त्यांचे कर्तृत्व कळले नाही, असे म्हणता येत नाही. इतिहासातला एकमेव शेतकरी नेता म्हणून शरद जोशी यांचे नाव जनमान्यता पावून प्रत्येक शेतकर्यांच्या हृदयात कोरले गेले आहे. शेतकऱ्यांना संघटित करून भीक नको हवे घामाचे दाम असा मंत्र देऊन शेतकऱ्यांना सन्मानाने जगायला शिकविण्याचे त्यांचे योगदान वादातीत आहे. शेतकऱ्याच्या मरणाचे कारण सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामध्ये दडले आहे, याविषयीसुद्धा आता कुणाचेच दुमत राहिलेले नाही, पण जातिभेदांचे अडथळे दूर सारून शरद जोशींच्या पाठीशी एकसंघ उभे राहण्याची ऊर्मी शेतकरी समाजामध्ये का निर्माण होत नाही, हाच खरा कळीचा मुद्दा आहे. शेतकरी आंदोलनामुळे शेतमालाला बरे भाव मिळालेत, असे खाजगीत मान्य करणारा शेतकरी जाहीरपणे तसे मान्य करेलच याची खात्री देता येत नाही. शरद जोशींमुळेच कर्जमुक्ती मिळाली असे चार भिंतीच्या आड बोलणारा शेतकरी चावडीवर बसल्यानंतर गावच्या राजकीय धेंडासमोर बोलताना कृषिमंत्र्यांनी कर्जमुक्ती केली असावी, असे कसे काय म्हणू शकतो, हाही चिंतनाचाच विषय ठरतो.

मात्र शेतकरी समाजाविषयी माझी काहीही तक्रार नाही आणि तक्रार असण्याचे कारणही नाही. हजारो वर्षे आर्थिक गुलामगिरीचे, लाचारीचे व अपमानास्पद जीवन जगता-जगता स्वाभिमान व सन्मानाचे जीवन जगण्याची प्रेरणा देणारी जनुकेच या शेतकरी समाजाच्या रक्त-मांस-पेशीतून हद्दपार झालेली असणार हे उघड आहे. आंदोलनाने शेतमालाचे भाव वाढून शेतकऱ्याच्या घरात स्वतःच्या हक्काचे वीस-पंचेविस हजार रुपये जास्त आले तरी त्याला ते महत्त्वाचे वाटत नाही व संघटनेचा झेंडा हातात घ्यावा, असेही वाटत नाही, मात्र; एखाद्या पुढाऱ्याने कोंबडी-बकरी घेण्यासाठी हजार दोन हजार रुपयांची अनुदान स्वरूपातील भीक मिळवून दिली तर त्या शेतकऱ्याला त्या पुढाऱ्याचा झेंडा हातात घेऊन नाचावेसे वाटते; एवढेच नव्हे तर आयुष्यभर त्या पुढाऱ्याचे धोतर धूत बसावेसे वाटते, हा स्वाभिमान निर्माण करणारी जनुके निष्क्रिय किंवा नष्ट झाल्याचा पुरावाच मानावा लागेल. पन्नास रुपयाची तूर बियाणाची पिशवी अनुदानावर फुकटात मिळविण्यासाठी साठ-सत्तर रुपये बसचे तिकीट खर्च करून तालुक्याच्या ठिकाणी सोसायटीसमोर चार तास रांग लावणारी माणसे शेतकरी समाजात मूबलक आणि घाऊक प्रमाणात उपलब्ध आहेत. शेतमालाचा उत्पादन खर्च दर्शविणाऱ्या हिशेबाशी शेतकऱ्याचे हाडवैर आहे. ताळेबंद आणि अंदाजपत्रक या दोन शब्दांची त्याला ॲलर्जी आहे. वर्षभराचा शेतीचा खर्च एका वहीत लिहून नफा-तोटा याचा आढावा घेणारा शेतकरी लाखात एखादा मिळाला तर आश्चर्य वाटावे, अशी स्थिती आहे.

शेतकऱ्यांची संघटना असावी असे त्याला वाटते, पण त्यात आपलेही योगदान असावे, हे त्याला मान्य नाही. शिवाजी जन्माला यावा; पण तो शेजाऱ्याच्या घरात, आपल्या घरात नको, हीच त्याची मनोधारणा कायम आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपली लोकशाही प्रगल्भ झाल्याचा आपण कितीही दिंडोरा पिटत असलो तरी जात आणि धर्म बाजूला ठेवून विकास किंवा अर्थकारणाच्या आधारावर मतदान करून देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेणाऱ्या नेत्याला किंवा उमेदवाराला मतदान करायचे असते, या मूलभूत जाणीवेपासून आमची लोकशाही हजारो मैल दूर आहे.

*एका-एकुल्या 'व्होटा'साठी, थैली-थैली नोटा*
*कुणी पिलवती इंग्लिश-देशी, कोणी हाणती सोटा*
*कोणी करिती लांगूलचालन, कोणी लोटांगण जाती*
*भले-शहाणे-सुविद्यही खाती, जातीसाठी माती*

ज्या लोकशाहीत सज्जन असो वा दुर्जन, पुढारी असो वा पत्रकार, वकील असो वा न्यायाधीश, शिक्षित असो वा अशिक्षित, श्रीमंत असो वा गरीब, थोर विचारवंत असो वा महान कलावंत; या सर्वांना जाती-पाती धर्म-पंथाच्या आधारावर मतदान करण्याचा रोगच जडला आहे, त्या लोकशाहीत केवळ शेतकरी तितुका एक-एक होऊन जाती-धर्माला तिलांजली देऊन पोटापाण्याच्या प्रश्नाच्या आधारावर मतदान करेल, ही कल्पनाच व्यर्थ ठरते. त्यामुळे मतपेटीतून प्रश्नाची उकल होण्याची शक्यता निकाली निघते.

लोकशाहीत दबावगटाला अनन्यसाधारण महत्त्व असते. शासकीय निर्णयप्रक्रियेवर प्रभाव पाडण्याची दबावगटाची क्षमता निर्विवाद असते; पण तेथेही आमचा शेतकरी तोकडा पडतो. अन्यायाविरुद्ध शेतकरी पेटून उठत नाही, पूर्ण ताकतीनिशी संघटित शक्तीचे प्रदर्शन करीत नाही त्यामुळे कधीकधी संघटनेच्या कार्यकर्त्यामध्ये नैराश्य येते आणि संघटनेचे कार्य थांबवून द्यावे, अशी दबक्या आवाजात कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू होते. अडीच तपाएवढा प्रदीर्घ काळ शेतकरी चळवळीसाठी खर्ची घालूनही जर शेतकरी समाजामध्ये हव्या त्या प्रमाणात जनजागृती होत नसेल तर या समाजासाठी पुढील उर्वरित आयुष्य खर्ची घालून वेळ दवडायचे थांबवून द्यावे काय, असाही एक मतप्रवाह अधूनमधून उचल खात असतो.

अशावेळी सर्वांनी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, अनेक पिढ्या शेतकरी समाजाला शुद्रतेची वागणूक मिळाल्याने या समाजातून सन्मानाने जीवन जगण्याची प्रेरणाच लोप पावलेली आहे. 'ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान' हाच त्याने जीवन जगण्याचा मूलभूत सिद्धांत म्हणून स्वीकारलेला आहे. देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगण्याचा आपलाही जन्मसिद्ध अधिकार आहे, याचा त्याला विसर पडलेला आहे. शेतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करण्याचा एक भाग म्हणून शेतकरी संघटना स्थापन झाली ती शरद जोशींना तशी आवश्यकता वाटली म्हणून; शेतकऱ्यांना संघटनेचे महत्त्व पटले होते म्हणून नव्हेच. शेतकऱ्यांना ना संघटनेची गरज होती ना शेतमालाच्या भावाची. लाखो शेतकरी एकत्र येऊन पहिल्यांदा संघटना स्थापन करण्यात आली आणि त्यांनी नंतर आपला नेता निवडला असे कधी घडले नाही. शरद जोशी परदेशात असताना भारतातल्या शेतकऱ्यांनी त्यांना पत्र लिहून भारतात येऊन संघटना स्थापन करण्याची विनंती केलेली नव्हती की, आदरणीय साहेब, भारतातील आम्हा शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे, तेव्हा तुम्ही तातडीने भारतात या आणि आमच्यासाठी शेतकरी संघटना स्थापन करून या हलाखीच्या स्थितीतून आमची मुक्तता करा. अगदी गावपातळीवरसुद्धा सर्व शेतकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन बैठक घेतली आणि शेतीच्या मुक्तीसाठी शेतकरी समाजामध्ये एकोपा घडवून आणायचा प्रयत्न केल्याचा इतिहास सांगत नाही; निदान माझी तरी तशी माहिती नाही.

शेतकरी समाजाची स्थिती अत्यंत दयनीय व हलाखीची आहे, यातून काहीतरी मार्ग निघायलाच हवा. त्यासाठी आपले सर्वस्व पणाला लागले तरी चालेल, अशातऱ्हेची मानसिक बैठक असणाऱ्या काही मंडळींना तशी गरज वाटायला लागली आणि त्यातूनच शेतकरी संघटनेचा उदय झाला. शेतकऱ्यांचे लाचारीचे जिणे संपवून त्यांना देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगता यावे याकरिता पक्ष, धर्म, जात वा इतर कोणत्याही भेदाभेदांचा अडथळा न येऊ देता प्रयत्न झाले पाहिजेत, असे ज्यांना-ज्यांना वाटले ते शेतकरी संघटनेचे पाईक झालेत.

शरद जोशींनी मांडलेले विचार आणि भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याचे अर्थशास्त्र गावागावात जाऊन शेतकऱ्यांना समजावून सांगण्याचे कार्य गेली अनेक वर्षे संघटनेचे पाईक करत आहेत. त्यातून नव्या लढाईची बीजे रोवली जात आहे. शेतकरी समाजात पावलोपावली व्हिलेज-बॅरिस्टर असूनही शेतमालास उत्पादनखर्च भरून निघेल एवढेसुद्धा भाव मिळत नाही म्हणून शेतीत अठराविश्व दारिद्र्य आहे एवढा साधा उलगडा देखील त्यांना आजवर झालेला नव्हता. शेतकऱ्याच्या घरात जन्माला येणे म्हणजे कर्जात जन्मणे, कर्जात जगणे आणि कर्जात मरणे, हे विधिलिखित असते, यावर शेतकऱ्यांचा ठाम विश्वास होता. त्याला सुखाने व सन्मानाने जगण्याचे स्वप्नही अजून पडलेले नसावे. तसे नसते तर शेतकऱ्याने नक्कीच काही ना काही हालचाल करून उपाय शोधलेच असते. नाकतोंडांच्या वर पाणी आले तर तो आत्महत्या करून मरायला तयार आहे पण रणांगणात उतरून लढायला तयार नाही, यातच सारे काही आले.

एवढ्या विपरीत परिस्थितीत शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची बांधणी केली. शेतकऱ्यांना लढाऊ बाणा शिकवला. शेतीच्या अर्थशास्त्राची शास्त्रशुद्ध पायाभरणी केली. मोठमोठ्या अर्थशास्त्र्यांना झेपणार नाही असे अर्थशास्त्र शेतकर्यांच्या भाषेत शेतकर्यांना समजावून सांगितले. हे काम नक्कीच सोपे आणि सहजसाध्य नव्हते. महात्मा गांधींना स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करून स्वातंत्र्यचळवळ उभारणे सोपे गेले कारण देशाला स्वातंत्र्य मिळाले तर सत्तेची खुर्ची आपल्याच ताब्यात येईल याची खात्री बाळगणाऱ्यार व त्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असणाऱ्या पुढाऱ्यांच्या फळीचा त्यांना भक्कम पाठिंबा लाभला होता. याउलट शरद जोशींचे तत्त्वज्ञान स्वीकारले तर शेतकऱ्याला आर्थिक स्वातंत्र्य मिळून राजकीय सत्ताकेंद्रेच प्रभावहीन होण्याची भीती या राजकीय मंडळींना कायम वाटत आली आहे. शेतकऱ्यांची लाचारी संपून जर तो स्वावलंबी झाला तर राजकारणाचा पायाच ढासळेल म्हणून कोणताही मजबूत राजकीय नेता किंवा पक्ष कधीच शरद जोशींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलित समाजात जागृती घडवून आणणे तुलनेने सोपे गेले कारण दलित समाजाचा सवर्णांकडून झालेला छळवाद याला दलित समाज आधीच कंटाळला होता आणि त्यातूनच त्या समाजात सन्मानाने जगण्याची प्रेरणा जागृत झालेली होती. शिवाय आंबेडकरांनी ज्या समाजासाठी कार्य केले तो समाज त्यांच्याच जातीचा होता. दलित समाज सर्वच जातींमध्ये विखुरलेला नव्हता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला वर्णसंघर्षाची धार प्राप्त झाली. मात्र शेतकरी चळवळीबाबत असे म्हणता येत नाही. शेतकरी समाज अनेक जाती-धर्मांमध्ये विभागला असल्यामुळे या चळवळीला वर्गसंघर्ष किंवा वर्णसंघर्ष अशी जोडही मिळाली नाही. या अनुषंगाने विचार केला तर या जातिव्यवस्थेमुळे संघटनेला काही फायदा होण्याऐवजी नुकसानच अधिक झाले आहे. जातीच्या आधारावर संघटनेत फूट पाडण्याचे काही राजकीय पक्षांकडून वेळोवेळी जाणीवपूर्वक प्रयत्न झालेले आहेत. त्या प्रयत्नांना प्रतिसाद देऊन दुसऱ्या व तिसऱ्या फळीतील नेते संघटनेला रामराम ठोकून अन्य पक्षात गेलेलेही आहेत. मात्र वैचारिक मतभेद झाल्याची सबब पुढे करून शरद जोशींना सोडून जाणारे तुरळक अपवाद वगळता बहुतेक सर्व थेट आपापल्या जातीच्या नेत्यांच्या कळपातच का जातात, हेसुद्धा एक न सुटणारे कोडेच ठरले आहे.

या सर्व पार्श्वभूमीचा विचार केला तर शेतकरी समाजासाठी कार्य करणे हे तुलनेने अधिक कठीण काम असले तरी ऐतिहासिक आणि महानकार्य आहे, याची खूणगाठ मनाशी पक्की बांधून घेणे गरजेचे आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७,
तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

# मार्केट कमिटीच्या कचाट्यातून निदान फळे आणि भाजीपाला मुक्त करा! - रवी देवांग



दि. २८ मार्च रोजी मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि शेतकरी संघटना अध्यक्ष रवी देवांग तथा सहकारी यांच्यात झालेल्या दीर्घकाळ वाटाघाटीत कृषिमंत्र्यांनी शासनाने फळे आणि भाजीपाला यांचा कृषि उत्पन्न बाजार समिती कायद्यांतून समावेश वगळण्याची भूमिका घेतली आहे असे आश्वासन दिले व तसे परिपत्रक काढून बाजार समित्यांचे या विषयी काय म्हणणे आहे, याची विचारणा संबंधितांकडे केली आहे. वास्तविक बाजार समितीमधून फळे आणि भाजीपाला यांना मुक्ती देऊन तसा जीआर (शासन निर्णय) व्हायला हवा होता. या विषयाची अंमलबजावणी झाल्यास शेतकरी आणि ग्राहक यांमध्ये थेट संबंध प्रस्थापित होतील. विद्यमान व्यवस्थेत बाजार समिती कर आडत्यांची दलाली, वजन न केलेल्या मालाची हमाली, मापाडी, व्यापाऱ्यांनी रुमालाखाली केलेले सौदे, गुंडांची दादागिरी इत्यादी कारणांमुळे मालाची किंमत ३० टक्क्यांनी वाढते. त्यामुळे शेतकरी व ग्राहक या दोघांचे नुकसान होते. बाजार समितीमध्ये ग्रेडींग शेड, कुलींग व्हॅन, कोल्ड स्टोरेज, ऑन लाईन पेमेंट इत्यादी सुविधा मिळत नाहीत. तसेच फळे आणि भाजीपाला हा नाजूक आणि नाशवंत शेतमाल असल्यामुळे हाताळणी करताना ४०% फळे आणि भाजीपाला याची नासाडी होते. मार्केट कमिट्यांच्या कचाट्यातून फळे आणि भाजीपाल्यास मुक्ती मिळाल्यास शेतकरी ग्राहक आणि बेरोजगार या घटकांचा एकंदरीत ४०% उलाढीच्या रकमेइतका लाभ होणार आहे. अर्थातच या शेतीविषयक सुधारणेमुळे यास व्यापारी, अडते, दलाल, कमिशन एजंट, गुंड, हमाल, मापाडी व संबंधित संघटित कर्मचारी विरोध करतील. याविरुद्ध शेतकऱ्यांनी प्रति आंदोलन करण्याच्या तयारीत राहावे असे आवाहन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवी देवांग यांनी केले आहे.

मंत्रिमहोदयांच्या चर्चेत मा. वामनरावजी चटप (माजी आमदार), गोविंद जोशी, जगदिश नाना बोंडे, मानवेंद्र काचोळे, गुणवंत पाटील हंगरगेकर इत्यादी उपस्थित होते. थोड्या उशिराने राजू शेट्टी यांनीही चर्चेत सहभाग नोंदवला. शेतकऱ्यांच्या बाजारपेठेच्या स्वातंत्र्याच्या दिशेने शासन एक पाऊल पुढे टाकत आहे. त्यासाठी सर्व शेतकरी संघटनांनी तसेच शेतकऱ्यांनी आपसातील मतभेद विसरून मार्केट कमिटीवर हल्लाबोल करण्यासाठी तयारीत राहावे.

# सांगलीत कृ.उ.बा. नियंत्रण विरोधी निदर्शने



**सांगली (शीतल राजोबा यांजकडून) :** दि. १४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता राजवाडा चौक सांगली येथे फळे, भाजीपाला, बटाटा, लसून-कांद्यावरील कृषि उत्पन्न बाजार समितीचे नियंत्रण काढून टाका. यासाठी निदर्शने करण्यात आली.

शेतकरी संघटना गेली २५ वर्षे बाजार समितीच्या बंधनातून शेतकऱ्याला मुक्त करा अशी मागणी करीत आली आहे; परंतु सरकारने त्याकडे आताच लक्ष दिले असून केंद्र सरकारने याची अंमलबजावणी करण्याबाबत राज्य सरकारला कळविले आहे. राज्य शासनाने राज्यातील सर्व बाजार समित्यांना नियंत्रणे हटविण्याबाबत विचारणा केली आहे. या सर्व बाजार समित्यांमध्ये आपलेच शेतकर निवडून गेले आहेत. ते सर्व बाजारसमितीचे पदाधिकारी मुंबई येथे एकत्र येऊन नियंत्रण मुक्ती करू नये, असा निर्णय घेण्याची शक्यता आहे. त्यास शेतकरी संघटनेचा तीव्र विरोध आहे. वर्षानुवर्षे शेतकऱ्यांना बाजार समितीमध्ये आडते, तोलाईदार, हमाल, बारदान, सेस या वेगवेगळ्या नावाखाली लुटत आली आहे. शेतकऱ्याला या नरकयातनेतून मोकळा श्वास घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकऱ्याला आपला माल कुठेही विकता येईल. त्यामुळे दलाल, आडते, मार्केट सेस ही मधली साखळी बंद झाल्याने थेट ग्राहकांना योग्य दरात शेतीमाल उपलब्ध होऊन शेतकऱ्यांना देखील योग्य भाव मिळेल. यासाठी आजचे निदर्शने करण्यात आली. युरोपीय देशांत व अमेरिकेमध्ये शेतीमाल विक्री साखळीत ३ ते ५ जण मध्यस्त असतात. तर भारतात ९ ते १२ जण मध्यस्थ राहिल्याने शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत शेतीमालाचे दर अवाच्या सव्वा वाढतात. त्यामुळे शेतकऱ्यांनाक मी दर मिळतो तर ग्राहकांना तो महाग पडतो. यासाठी एफडीआयला परवानगी द्यायला हवी व शेतीमाल नियंत्रणमुक्त व्हायला हवा. यावेळी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संजय कोले यांनी मार्गदर्शन केले. या निदर्शनात स्वभापचे एम. के. माळी, शीतल राजोबा, धनपाल गळतगे, सुहास गाडवे, बापूसाहेब पिड्डे, अण्णासाहेब कुरणे, कृष्णाप्पा मगदूम, संजय सुतार, अल्लाउद्दीन जमादार, फंचू निरवाणे, शार्दुल सकळे, हणमंत कोळी, यशवंत केडगे, अनिल मगदूम, सदाशिव माळी, आदिनाथ उपाध्ये, तृशांत मगदूम, राम देवार्डे, दयानंद कोले, रघुनाथ मोहिते, किशोर मगदूम इत्यादींनी भाग घेतला.

# वसंतदादा साखर कारखान्याच्या बेकायदेशीर वार्षिक सभेविरुद्ध प्रादेशिक सहसंचालकांकडे तक्रार दाखल




**सांगली :** वसंतदादा शेतकरी सह. कारखाना लि. सांगलीची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २८ मार्च रोजी बेकायदेशीरपणे पार पडली. त्या विरोधात शेतकरी संघटनेने दि. १२ एप्रिल रोजी प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर व सहनिबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर यांच्याकडे आक्षेप, तक्रार सादर केली आहे.

सन २००५-०६ ते २०१०-११ या वर्षांचे अहवाल वैधानिक लेखापरीक्षण, दोष दुरुस्ती अहवाल, कारखाना वार्षिक कामकाज अहवाल इत्यादी बाबी केवळ २० मिनिटांच्या कालावधीत वाचून मंजूर केले अहो हे बेकायदेशीर आहे. याबाबत आम्ही ४ दिवसांच्या फरकाने साधारण सभेची मागणी केली आहे. ती मंजूर करावी, सहनिबंधक दर्जाचा अधिकारी सभेचा अध्यक्ष व नियंत्रक असावा, सभेचे व्हिडीओ चित्रण व्हावे अशी मागणी केली आहे.

सरकारने आपल्यावरील आर्थिक जबाबदारी टाळण्याच्या उद्देशाने आणि सहकार क्षेत्रातील राजकारण्यांना सांभाळण्यासाठी सन १९८९ पासून आज अखेर ४ वेळा साखर कारखान्यांना शेअर्सच्या दर्शनी मूल्यात (सध्या ५ चे १० हजार) वाढ करण्याचा आदेश देते तथापि सहकारी कायद्यांतर्गत सरकार व निबंधकांवर असलेली जबाबदारी, कर्तव्ये पार न पाडता भाग धारकांचा बोजा वाढविण्यास सहकारी संस्थांना फूस देते आहे. ही बाब बेकायदेशीर व चुकीची आहे. सहवीजनिर्मिती व डिस्टलरी प्रकल्पांबाबत व्ही.एस.आय.पुणे, साखर संघ मुंबई नॅशनल शुगर इन्ड. कानपूर यांच्याकडून शिफारशी झाल्यात काय? अशी शिफारस नसल्यास असे प्रस्ताव निबंधक, शासनाकडे कसे पाठविले जातात? अथवा साधारण सभेचा विषय कसा होऊ शकतो? युथ डेव्हलपमेंट क्रेडीट सोसायटीकडील मुद्दल व व्याज, कोर्ट खर्चासह रक्कम वसूल करावी.

२८ मार्च २०१२ रोजीच्या संयुक्त साधारण सभेत सभासद शेतकऱ्यांना पैलवानांकडून संचालक मंडळाने मारहाण केली. यावेळी सभेच्या अध्यक्षांनी का कारवाई केली नाही? पोलिस व दंडाधिकारी यांनी संबंधित मारेकऱ्यांना अटक का केली नाही? अशा अनेक बेकायदेशीर गोष्टींची तक्रार दाखनल करून १) २८ मार्च २०१२ची सभा रद्द ठरवावी व ताबडतोब दुसरी सभा बोलवावी. २) पोटनियम दुरुस्ती फेटाळणी/रद्द करावी, ३) जमीन खरेदी-विक्री प्रस्तावास कायम स्थगिती द्यावी. ४) युथ डेव्हलपमेंटकडून मुद्दल, कोर्ट, वसुली खर्च आणि शे. १२% व्याज वसुल करावी, अशी मागणी केली आहे. यावेळी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संजय कोले, माजी अध्यक्ष जयपाल फराटे, स्वभाप जि. प्रमुख एम. के. माळी, शे.सं. प्रमुख शीतल राजोबा, अल्लाउद्दीन जमादार, गुंडा माळी, भगवान पाटील, रावसो दळवी, सुहास गाडवे, कृष्णाप्पा मगदूम, एकनाथ कापसे, धनपाल गळतगे आदी उपस्थित होते.

# लेंडी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा तहसीलवर मोर्चा

**मुखेड :** तालुक्यात होत असलेल्या अंतर राज्यीय लेंडी धरणातील बुडीत क्षेत्रात गेलेल्या धरणग्रस्तांना आजवर पुर्नवसनासाठी जागा देण्यात आली नाही ज्यांना जागा मिळाले तेथे जिवन जगणे अवघड झाले आहे, या सर्व बाबी लक्षात घेवुन शेतकरी संघटेच्या वतीने बुधवारी मुखेड तहसिल कार्यालयावर प्रकल्पग्रस्तांच्या भव्य मोर्चा काढण्यात आला. यात हजारो शेतकरी, प्रकल्पग्रस्तांनी आपला सहभाग नोंदविला. मागील पंचेविस वर्षांपासून होत असलेल्या या अंतरराज्यीय लेंडी प्रकल्पात अनेक अडचनी येत असुन नुकतेच या धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांना मावेजा मिळे पर्यंत बंद पाडण्यात आले आहे. सदर धरणास मंजुरी मिळुण पंचेविस वर्षांचा काळ लोटला. त्यावेळी धरणासाठी लागणारी रक्कम आता कितीतरी पटीने वाढली मात्र धरणाचे काम अजुनही कासवगतीनेच चालु आहे यास कारण म्हणजे धरणासाठी घेण्यात आलेल्या अकरा गावातील शेतकऱ्यांची जमिनी असो वा त्यांची घरे त्यांना शासनाकडुन त्यावेळी अनेक अश्वासने देण्यात आली कुंटूबातील एकास शासकीय सेवेत सामवुन घेणार, पुर्नवसनात चांगल्या जमिनी देणार, पक्के घरे बांधुन देणार यासारखी अनेक आश्वासने देण्यात आली होती. मात्र जसा काळ लोटत गेला ते सर्व आश्वासने शासन दरबारीच धुळखात पडुन राहीले आहेत. शासनाला पुन्हा जागे करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने बुधवारी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. यात अकरा धरणग्रस्त गावातील शेकडो शेतकरी आपल्या कुटूंबियांसोबत सहभागी झाले होते. यावेळी माजी आ. वामनराव चटप यांनी मार्गदर्शन केले. या मोर्चात राज्यउपाध्यक्ष गुणवंतराव पाटील हंगरगेकर, माजी आ. सुभाषराव साबणे ,शिवसेना तालुका प्रमुख शंकर पाटील ठाणेकर यांनी याविशयावर मार्गदशन केले यावेळी धरण ग्रस्तांच्या विविध मागण्याचे एक निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले यात सर्व धरणग्रस्तांना शेतीला व पूर्नवसीत गावातील घरांना नव्या प्रस्तावित कासदा एलएआरआर प्रणाणे मावेजा द्यावा, आधि पुर्नवसन मग धरण या



सरकारी धोरणानुसार संपूर्ण प्रकल्पग्रंस्तांचे सर्व कायदेशीर सोईसुविधांसह पूर्ण परिपूर्तता झाल्याशिवाय धरणाचे काम पुर्वरत सुरू करण्यात येवु नये, घर बुडीत गेलेल्या नागरीकांना पुनर्वसन अनुदान देण्यात यावे, या प्रकल्प ग्रस्तांना प्रमाणपत्र लवकरात लवकर वाटप करण्यात यावेत, धरण ग्रस्तांच्या स्थलांतरासाठी शासनाचे वाहण माफक दरात उपलब्ध करून देण्यात यावे, या प्रकल्पग्रस्त गावातील सुषिक्षीत बेरोजगारांना षासकीय सेवेत तसेच एम.आय.डी.सी मधी कारखान्यात रोजगार उपलब्ध करूण देण्यात यावे, यातील बाराबलुतेदारांच्या कुंटूब प्रमुखाला कमी व्याजदराने व्यवसायाकरीता कर्ज देण्यात यावे,प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांना दरमहा पाच हजार रूपये पेन्शन देण्यात यावे यासह अनेक मागण्या या निवेदनातुन करण्यात आले आहेत. यावेळी माधवराव आंधळे, धोडिंबा पवार, जौनोदिदन पटेल, माधवराव नुच्चे, नरसा गौंड, गंदेवाड, विकास श्रीवास्तव, बळीराम हासनाळे, आनंद येरेवाड आदिंची उपस्थिती होती.

# विविध चळवळींसोबत एकत्र आंदोलनाची तयारी

योगगुरू रामदेव बाबा यांचे काळे धन परत आणण्याचे आणि व्यवस्था परिवर्तनाचे आंदोलन, तसेच भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे प्रणेते अण्णा हजारे यांचे सक्षम लोकपाल-लोकायुक्त आंदोलन यांनी देशात चांगलेच मूळ धरले आहे. ग्रामीण भागातील समस्यांनी शेतकरी बहुजन समाज ग्रासलेला असताना व शहरातील नागरिक विद्यमान व्यवस्थेने हैराण झालेले असताना या दोन्ही आंदोलनांनी देश ढवळून निघत आहे. ही प्रक्रिया दिशाहीन होणे देशाला परवडणारे नाही. प्रस्थापित राजकीय पक्ष यात खोडा घालतील. यातून देश अराजकतेकडे जाण्याचा धोका नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर देशातील अर्थकारणाचा, ग्रामीण व नागरी समस्यांचा प्रस्थापित राजकारणावर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्रातील व देशातील विविध जनहीतवादी चळवळींच्या अग्रणींना एकत्र आणून पुढील कार्यक्रम व्हावे यासाठी भेटीगाठी घेणे, चर्चा करणे ही प्रक्रिया सुरू झाली आहे.

चार महिन्यांपूर्वी हरिद्वार येथे योगगुरू रामदेवजी बाबा यांच्या समवेत देशभरातील अनेक शेतकरी संघटनांसमवेत झालेल्या चर्चेत शेतीमालाला रास्त भाव, संपूर्ण कर्जमुक्ती आणि भूसंपादन या मुद्यांवर एकत्र येऊन देशव्यापी आंदोलन उभे करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. वरील चर्चेत शेतकरी संघटनेचे संस्थापक व प्रणेते शरद जोशी हजर होते. लवकरच या चर्चे चा पुढील टप्पा आगामी बैठकीत ठरेल.

दरम्यान वरील आंदोलनांच्या दृष्टिकोनातून मा. अण्णा हजारे यांच्याशी विचार विनिमय करण्यासाठी, शेतकरी संघटनेचे नेते आज राळेगण सिद्धी येथे त्यांना भेटले. शिष्टमंडळात संघटनेचे अध्यक्ष रवी देवांग, माजी आमदार, वामनराव चटप, मानवेंद्र काचोळे, अनिल घनवट, श्री. कडू अप्पा पाटील यांचा समावेश होता. अण्णा हजारे यांच्याशी झालेल्या चर्चेत भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन, निवडणूक सुधारणा, सत्तेचे विकेंद्रीकरण शेतीमालाचा रास्त भाव, जमिनीचे अधिग्रहण, काळे धन परत आणणे व व्यवस्था परिवर्तन, ग्रामसभेचे व व्यक्तिचे अधिकार यांविषयी चर्चा झाली. या दृष्टीने जून महिन्यात पुणे येथे विविध चळवळींच्या अग्रणींची बैठक करण्याविषयी चर्चा झाली. बैठकीची विषयपत्रिथा निश्चित करण्याचे काम सुरू झाले आहे. या बैठकीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ति व संघटना यांची चाचपणी सुरू आहे. या संदर्भात शेतकरी संघटनेच्या आगामी कार्यकारणीत निर्णय व कार्यक्रमाची सविस्तर घोषणा करण्यात येईल, असे रवी देवांग व वामनरावजी चटप यांनी कळविले आहे.